समाजशास्त्रातील 'परस्परपूरक' समांतर रेषा
दलवाई आणि मौदुदी


डॉ. अलीम वकील

प्रस्तुत लेखात समाजवाद्यांमध्ये यशस्वी वैचारिक क्रांती करणाऱ्या हमीद दलवाई आणि मुसलमानांमध्ये फसलेल्या वैचारिक क्रांतीचे प्रणेते मौलाना मौदुदी यांच्या विचारांचे आकलन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दोघांनीही भरपूर लेखन केलेले आहे. या लेखनाचा अभ्यासही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. दोघांचे लेखन आवाहनात्मक आणि आव्हानात्मक आहे. मौदुदींचे साहित्य मूलतः उर्दूमध्ये असले तरी त्यापैकी बऱ्याचशा साहित्याचे इंग्रजीत भाषांतर झाले आहे. अ. भि. शहा यांच्या प्रेरणेने दलवाईंनी 'मुस्लीम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' (नचिकेत प्रकाशन मुंबई, १९६८) हे पुस्तक इंग्रजीत लिहिले. दलवाई आणि मौदुदींनी चळवळी उभारल्या. १८ मार्च १९६६ला सात मुस्लीम महिलांचा मोर्चा दलवाईंनी मुंबई विधानसभेवर नेला. या लेखात दलवाई आणि मौदुदींच्या केवळ विचारांचाच परामर्श घेतला आहे.

दलवाई-मौदुदींची वैचारिक जडणघडण

१९०३मध्ये औरंगाबाद (महाराष्ट्र) येथे मौदुदींचा जन्म झाला. त्या वेळी औरंगाबाद हैदराबाद संस्थानात होते. या संस्थानी वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर अवश्यमेव झाल्याचे आपल्याला दिसते. हमीद दलवाईंचे गुरुतुल्य मित्र प्रा. कुरुंदकरांवरही हा परिणाम प्रकर्षाने दिसतो. प्रस्तुत स्थानी हे मुद्दाम लिहिण्याचे कारण असे की कुरुंदकरांचा भारान्वित परिणाम दलवाईंकडे संक्रमित झाला आहे. मौदुदींच्या मनाला आणि बुद्धीला बंदिस्त करणाऱ्या 'जंभूरी खिलाफत'ची पाळेमुळे निजामी राजवटीत अडकलेली वाटतात.

दलवाईंचा जन्म तब्बल तीस वर्षांनंतरचा आहे. ते वयात येईपर्यंत त्यांच्या कुटुंबाची स्थिती सर्वसामान्य मुस्लीम कुटुंबासारखी - त्याचे गुणदोष जमेस धरून आहे. लेखकाचा अनुभव त्याच्या साहित्यात डोकावितो असे मानले तर 'इंधन''मधील भूमीहीन मुस्लीम खोत प्रातिनिधिक ठरावेत.





स्वतः नायक (कोणत्याही मुस्लीम धर्मसंस्कारांना झुगारणारा), कादंबरीच्या शेवटच्या भागात पालखीला सामोरी जाणारी – काही हिंदू संस्कार निरागसपणे पाळणारी – त्याची भाभी; पैशाने माजवलेला इसाक, लक्ष्मीने लोभाविलेली लक्ष्मी; तारुण्यसुलभ भावनांनी वहाविलेली सुमती, नायकाचा भाऊ, हरबाराव या सर्वांना वेढणाऱ्या गावकुसाचा परिणाम जमेस धरता येईल.

संस्कारक्षम वयाच्या चौदाव्या वर्षापासून दलवाईंवर राष्ट्र सेवादलाचे संस्कार झाले. त्यांना नास्तिक बनविणाऱ्या टोकदार अनुभवांचे दर्शन आपणास कुठे आढळत नाहीः त्यांचे कुटुंब सश्रद्ध मुस्लीम संस्कार असलेले असले पाहिजे. अपवादात्मक प्रमाणात अशा कुटुंबात दलवाईंसारखी बुद्धिप्रामाण्यवादी व्यक्ती आढळून येते. आंतरिक प्रबळ इच्छेने त्यांनी बुद्धिवाद्यांशी संपर्क साधला. 'वेद अपौरुषेय नाहीत, प्रमाणही नाहीत : स्मृतीचा कायदा मान्य नाही, हे घोषित करून मी पुन्हा हिंदू आहेच', असे ठासून सांगणाऱ्या प्रा. नरहर कुरुंदकरांच्या सहवासात ते आले.' ही खास शैली आहे. धर्मशास्त्र नाकारून इतर धर्मांवर टीका करण्याच्या नैतिक अधिकारावर दावा तिच्यामुळे सांगता येतो. यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुलेपणाने हिंदू हितसंबंधांचे रक्षण करता येते, जसे कुरुंदकरांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा कळत नकळत मागोवा घेतला जातो. हमीद दलवाईंची गफलत नेमकी या ठिकाणी झाली.

इस्लामचे स्वरूप हिंदू धर्मासारखे नाही. तरी दलवाईंनी इस्लामची मूलतत्त्वे नाकारली. पण त्यामुळे निर्माण झालेली पोकळी मुस्लीम हितसंबंधांची जपणूक करून भरून काढली नाही! निदान 'जागर' लिहिताना संपूर्ण पुस्तकभर ते 'हिंदू' आहेत हे तर कुरुंदकर विसरलेलेच नाहीत. फक्त एकच उदाहरण देतो. ''आपण हिंदू लोक परमेश्वर न्यायी आहे, असे म्हणतो.* मुस्लीम धर्मशास्त्राला ही कल्पना मान्य नाही. त्यांचे म्हणणे असे की, न्याय नावाची कोठली स्वतंत्र बाब आहे आणि परमेश्वर तिचे परिपालन करतो, हे म्हणणे परमेश्वरी सार्वभौमत्वाला, सर्वतंत्रस्वतंत्रेला बाधक आहे. म्हणजे कादिर-ए-मुतलकच्या भूमिकेला मारक आहे.''[३] या वाक्यातील 'आपण हिंदू लोक' याकडे लक्ष वेधतो.

दलवाईंच्या जडणघडणीत कुरुंदकरांचा वाटा होता. हे त्यांनीही मान्य केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, दलवाईंना त्यांची मते मान्यवर नेत्यांना पटवून देता येत नव्हती. म्हणून त्यांनी आत्मशोधन केले.[४] त्यांना उर्दू भाषाही येत नव्हती. त्या काळी दलवाईंचे इंग्रजी वाचन बेताचे असे. इस्लामचे धर्मशास्त्र अगर इस्लामचा इतिहास याविषयी त्या काळी त्यांनी फारसे वाचलेले नव्हते. ...काही प्रमाणात दलवाईंच्या मनात स्वतःच्या भूमिकेविषयी जी खात्री पटली त्याचे कारण आरंभीच्या काळात तरी मी व अ. भि. शहा हे होतो, असे मला वाटते.[५] दलवाईंवर सकारात्मक आणि नकारात्मक लिहिणाऱ्यांनी हे मान्य केले आहे! 'मुस्लीम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' हे इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध होण्याचे बरेचसे श्रेय वसंत पळशीकर शहांना देतात.[६]

दलवाई उर्दू शिकण्यासाठी प्रा. स. मा. गर्गेंकडे गेले होते. उर्दू शिकताना आणि शिकल्यानंतर कुरुंदकरांनी जे केले त्यापेक्षा त्यांनी काही वेगळे केले नसते, हे त्यांनी उराशी बाळगलेल्या उद्दिष्टावरून लक्षात येते. उर्दू वृत्तपत्रांमध्ये मुस्लिमांना फूस कशी दिली जाते हे स. मा. गर्गेंनी शोधून त्याचा मराठी अनुवाद मराठी वृत्तपत्रांमध्ये आणि नियतकालिकांमध्ये छापण्याची योजना होती कारण उर्दू वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांमुळे आणि लेखांमुळे मुस्लिमांच्या भावना भडकविल्या जातात व त्याची परिणती दंगलींमध्ये होते याची शंका दलवाईंना होती. 'सकाळ' आणि 'साधना' यांनी हा अनुवाद प्रकाशित करावयास संमती दिली होती.[७] उर्दू वृत्तपत्रे भडकावू मजकूर प्रकाशित करीत नव्हती असे कोणीही म्हणणार नाही. परंतु मराठी वृत्तपत्रे-निदान काही-असे काही करतच नव्हती असा दावा मराठीवर प्रेम करणारे दलवाई करू शकले नसते. मुस्लीम वर्तुळात शिक्षणासंबंधी, खेळासंबंधी, त्यांच्या समस्यांसंबंधी काय चालले आहे हे कळवून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. कानोसा घेण्यासाठी वृत्तपत्रीय माध्यम पुरेसे असते. परंतु मुस्लीम माणूस समजण्यासाठी पुरेसे नसते. माणूस समजायला वेळ लागतो आणि मुस्लीम माणूस समजायला जरा जास्तच. पूर्वग्रह असले तर समजणे कठीणच! मुस्लीम समजायला वेळ द्यावा लागतो. पांढरपेशांमध्ये बसून तो समजत नसतो. दलवाईंनी जो मुस्लीम पाहिला तो आक्रमक, धर्मांध, इस्लामासाठी जान कुर्बान करणारा, स्त्रीलंपट, मुस्लीम ऐक्यासाठी तडफडणारा, देशद्रोहाचे निर्लज्ज प्रदर्शन करणारा, पानाचा तोबरा तोंडात धरल्यासारखा तलाक तोंडात धरलेला, दंगल करण्यास सज्ज, गुंडागर्दी करावयास उत्सुक असा आहे. गटारीवरच्या झोपडपट्टीत राहणारा, अर्धपोटी राबणारा, कुपोषणग्रस्त, अनेक अंधश्रद्धांमध्ये अडकलेला, भोंदूबाबांकडून आणि डॉक्टरांकडूनही नागविला जाणारा, स्वच्छतेच्या सोयी नसणारा, अशिक्षित, दारूबाज, सट्टेबाज मुसलमान दलवाईंना दिसला नाही. नेहमी समतेच्या समेवर येणाऱ्या त्यांच्या समाजवादी मित्रांनी तर हा मुसलमान पाहिला असेल. त्यांनी 'तो' दलवाईंना दाखविण्याची तसदी घेतली नाही – की त्यांना पण 'तो' दिसला नाही! माणूस समजावयास समाजात शिरावे लागते किंवा कुणीतरी त्याला समाजात लोटावे लागते. दलवाईंच्या बाबतीत असे काही घडलेच नाही. या अपेक्षा मौदुदी पूर्ण करणार नाहीत हे उघड आहे.

मुस्लीम माणसे जेथे जमतात – प्रार्थनास्थळे असतील, प्रेतयात्रा असतील, विवाहसमारंभ असतील, शाळांमधील कार्यक्रम असतील, उरूसकव्वाल्या असतील, ईदगाहमधील नमाज असेल, समाजातील समन्वय, हेवेदावे, मत्सर, गटबाजी – सगळे समजून घ्यावे लागतात. आत्यंतिक हिंदू म्हणवून घेऊन गांधीजींनी सर्व धर्मीयांशी नाते जोडले. गांधीजींच्या लेखी

*असे मुस्लीम मानतात. परमेश्वरास सर्वांत मोठा न्यायी – अल् अदल असे म्हणतात.

सर्व धर्म सारखे असतात. या वाक्यातील महान अर्थ दलवाईंना समजला. विद्वानांना समजला; बरे झाले तो अर्थ सर्वसामान्यांना समजला नाही, नाही तर किती लोक गांधीजींच्या मागे गेले असते? मुस्लीम समाजजीवनाची शिदोरी दलवाईंजवळ नव्हती.

दलवाई – एक मुस्लीम?

दलवाईंमधील एक अंतर्विरोध अनाकलनीय आहे. ते स्वतःला मुस्लीम म्हणवितात आणि नास्तिक असल्याची ग्वाहीसुद्धा देतात. दलवाईंच्या वतीने कुरुंदकरांनी तशी ग्वाही दिली आहे. 'पवित्र कुराण हा धर्मग्रंथ अंतिम व परिपूर्ण नाही. तोही बराचसा कालबाह्य झालेला आहे, शिवाय अपूर्ण आहे, हे घोषित करून हमीद दलवाई मुसलमान आहेतच.'[८] प्रथमतः दलवाई नास्तिक म्हणवून घेतात. नास्तिक म्हणजे नाकारणारा– ईश्वराचे अस्तित्व नाकारणारा म्हणजे कुफ्र करणारा काफिर आणि लोक काफिर म्हणतात त्याचे शल्य बाळगावयाचे! हिंदू आस्तिकांनाही काफिर म्हणत नाहीत, मुश्रिक म्हणतात. वरून मुस्लीम म्हणविणारा परंतु आतून मुस्लीमद्वेष करणाऱ्यास मुनाफिक म्हणतात.

'मी मुसलमान आहे'[९] या लेखात दलवाईंनी त्यांचे मुसलमानपण दर्शविण्यासाठी 'मौ. मौदुदी, मौ. आजाद, मौ. मदनी, श्री सोझ... या श्रद्धेने व आचरणाने एकमेकांपासून इतक्या भिन्न असलेल्या व्यक्तींचा जर मुस्लीम या पदाने निर्देश होत असेल तर मीही स्वतःला एक मुस्लीम मानतो, याचा श्री सोझ ह्यांनी एवढा विषाद का मानावा हे मला समजू शकत नाही. तसे पाहिले तर कोणाला मुस्लीम मानावे आणि कोणाला मानू नये हे ठरविण्याचा श्री सोझ यांना अधिकार तरी कुणी दिला?' असा गंमतीदार युक्तिवाद दलवाईंनी केला. या लोकांमध्ये एकाही व्यक्तीने स्वतःस नास्तिक म्हणवून घेतलेले नाही! ईश्वरावर व एकाच ईश्वरावर ईमान-श्रद्धा असणे हा मुस्लीमत्वाचा गाभा आहे. मुहंमदांना (स्व) प्रेषितत्व मिळाल्यानंतर तब्बल तेरा वर्षे त्यांनी (स्व) मुसलमानांमध्ये एकाच ईश्वरावर श्रद्धा दृढ करण्याची तबलीग केली! ही बाब दलवाईंना माहीत नसावी. परंतु उर्दूचे गाढे अभ्यासक प्रा. कुरुंदकरांना तर नक्कीच माहीत असली पाहिजे. काही सेक्युलर मुस्लिमांवर त्यांच्या मुस्लीमत्वाविषयी शंका घेतली गेली होती. मोईन शाकिर, फैजी, असगरअली इंजिनिअर अशी नावे डोळ्यासमोर येतात. यांनी 'या' शंकेचे भांडवल केल्याचे ऐकिवात नाही.

अगदी सरळपणे दलवाईंच्या विचारांची दिशा रसेलसारखी ''व्हाय आय ॲम नॉट अ ख्रिश्चन?'' आहे. अर्थात रसेल यांची विद्वत्ता वजा करून दलवाईंचा युक्तिवाद 'व्हाय आय ॲम नॉट अ मुस्लीम?' या वाटेवरचा आहे. त्यांनी '...क्रांतिकारी विचारवंत'मधील १२४ पानावर म्हटले आहे की, ''पण मी वर स्पष्ट केल्याप्रमाणे मुस्लीम ही संकल्पना इस्लामच्या अनुयायी या संकल्पनेहून अधिक व्यापक आहे.'' या उद्धरणात 'पण मी वर स्पष्ट केल्याप्रमाणे – असे म्हटले आहे. पण त्यांनी ते कुठेच स्पष्ट केलेले नाही. अगोदरच्या पानांमध्येही नाही. वाचकांनी पान १२४ काळजीपूर्वक आणि जरूर वाचावे. सर्वांना कळेल अशा उर्दू-मराठी शब्दकोशात मुस्लीमचा अर्थ 'मुसलमान' असा दिला आहे. 'मानणारा' असा त्याचा दुसरा अर्थ आहे. 'मुस्लीम' या शब्दाचे व्यापकत्व उर्दूचे जाणकार कुरुंदकरांनी हसण्यावारी न्यावयाचे होते. यानंतर दलवाईंचे मुनीर कमिशन साररूपी शेऱ्यासंबंधीचे आकलन त्यांच्या सोयीचे आहे. पाकिस्तानातील मुस्लीम धर्मपंडितांना जस्टिस मुनीर यांनी मारलेला जबरदस्त टोमणा दलवाईंच्या लक्षातच आलेला दिसत नाही.

पाकिस्तानात कादियानी आणि मुसलमानांमध्ये दंगली झाल्या. कादियानींना गैरमुस्लीम ठरविल्यानंतर या दंगली झाल्या (१९५३). मुस्लीम कोणास म्हणावे हा प्रश्न मुस्लीम धर्मपंडितांना विचारण्यात आला. साक्षीत आपला पंथ सोडून इतर सर्व पंथ गैरमुस्लीम असे सर्वच मुस्लीम पंथांच्या मौलानांनी गंभीरपणे सांगितले. याचा अर्थ (मुस्लीम धर्मावर आधारित) पाकिस्तानात एकही मुस्लीम नाही! भारतात अगदी अशीच परिस्थिती सेक्युलॅरिझमची झाली आहे. प्रत्येक राजकीय पक्ष तो सोडून इतर 'स्युडो सेक्युलर' आहेत असे म्हणतो याचा अर्थ सर्वच राजकीय पक्ष 'स्युडो सेक्युलर' आहेत असा 'पंच'ही मारण्यात आला होता.

महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाची ढाल दलवाई विनोदी पद्धतीने वापरतात. गांधीजींनी अस्पृश्यतेचा अव्हेर केला म्हणजे ते पाखंडी होत नाहीत, असा दावा दलवाई करतात. परंतु गांधीजी ईश्वर मानतात या वास्तवाकडे कानाडोळा करतात. ईश्वर सत्य आहेपासून सुरुवात करीत सत्य ईश्वर आहे या निष्कर्षापर्यंत गांधीजी येतात. या कारणास्तव दलवाईंनी शोधलेला गांधीजींचा आसरा सोयीसाठीचा आहे. अस्पृश्यतेस हिंदूधर्मात स्थान नाही हे सांगण्यासाठी हिंदू धर्मशास्त्राचा उपयोग करून घेण्यात आला आहे. ही घटना १९३०च्या दशकाच्या पूर्वार्धातील आहे. १९३२मध्ये गांधीजी म्हणाले – 'अस्पृश्यता जिवंत राहिली तर हिंदूधर्म मृत्यू पावेल आणि हिंदूधर्म जिवंत राहावयाचा असेल तर अस्पृश्यता मृत्यू पावली पाहिजे.' इस्लाम धर्म जिवंत राहावयाचा असेल तर कुणाचा मृत्यू झाला पाहिजे हे दलवाईंनी शोधले नाही, शोधून मुसलमानांना पटविले नाही. गांधीजींना हिंदू धर्म वाचविण्याची कळकळ होती हे कोण नाकारेल?

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी हिंदुधर्मशास्त्रातील आधार शोधण्यात आले. अस्पृश्यतानिवारणार्थ ज्या वेळी गांधीजींनी एकवीस दिवसांचा उपास केला त्याच एकवीस दिवसाच्या काळात महामहोपाध्याय श्रीधरस्वामी पाठक यांनी 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' हा ग्रंथ लिहिला. पाठक यांचा जन्म १३.२.१८७८ रोजी जळगाव जिल्ह्यातील पारोळा येथे झाला व २३.३.१९६०

रोजी कानपूर जिल्ह्यातील ब्रह्मावर्त येथे त्यांचे देहावसान झाले. या ग्रंथाची तिसरी आवृत्ती २०१०च्या जून महिन्यात निघाली. या आवृत्तीची प्रस्तावना चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी लिहिली. प्रस्तावनेत भारतातील शूद्रांवर होणाऱ्या अन्यायाची दखल प्रसिद्ध शायर डॉ. इकबाल यांनी कशी घेतली हे धर्माधिकारी उद्धृत करतात[१०] –

आह, शूदर के लिए हिंदोस्ताँ
गमखाना है
दर्दे इन्सानी से इस बस्तीका
दिल बेगाना है।

अशा पुस्तकाची व्यक्तिशः गांधीजींना काहीच गरज नव्हती हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु सर्वसामान्यांसाठी म्हणाल तर अवश्य!

मुस्लीम संस्कृतीने मला घडविले असे दलवाई अनेकदा म्हणतात. एखादी संस्कृती एखाद्या व्यक्तीला घडविते असे आपण ज्या वेळी म्हणतो त्या वेळी व्यक्ती एका प्रदीर्घ प्रक्रियेतून जाते. कौटुंबिक संस्कारांना, रीतीरिवाजांना, सामाजिक आणि धार्मिक संस्कारांना समजून उमजून व्यक्ती कसा प्रतिसाद देईल हे पाहाणे उचित असते. यासंबंधींचा तपशील दलवाईंच्या लेखनात मांडण्यात आलेला नसावा, नाही तर तो नक्कीच प्रकाशझोतात आला असता.

तलाकपीडित मुस्लीम महिलांची वेदना दलवाईंनी चव्हाट्यावर मांडली. त्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल कुणी शंका घेण्याचे कारण नाही. त्रिवार तलाकच्या पद्धतीचा प्रचंड प्रमाणावर गैरवापर झाला हा त्यांनी मुस्लीम समाजावर आरोप केलेला नाही तर सत्यकथन केले आहे. या प्रश्नाची–समस्येची केवळ चर्चा करून चालणार नाही तर त्यावर उपाययोजना केली पाहिजे असा त्यांनी केलेला आग्रह धुडकावून लावण्यासारखा नाही. पोटगीसाठी न्यायालयात जाणाऱ्या मुस्लीम महिलांची संख्या खूप कमी होती. त्रिवार तलाक देण्याचे गांभीर्य, पत्नीवर कोसळणारे संकट, मुलाबाळांची होणारी आबाळ यावर मुल्ला-मौलवींनी गंभीरपणे पाहिलेच नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र समान नागरी कायदा म्हणजे हिंदू कायदा नव्हे हे जोरदारपणे दलवाई संसूचित करू शकले नाहीत. मुस्लिमाने धर्मांतर केले तरी त्याला मुस्लीम पित्याच्या संपत्तीत वाटा मिळतो परंतु हिंदूने धर्मांतर करून इस्लाम स्वीकारला तर त्याला हिंदू पित्याच्या संपत्तीत वाटा मिळत नाही ह्या बाबी निदर्शनास आणावयास हव्यात. त्याचप्रमाणे अशा समस्या सोडविण्यासाठी दलवाईंनी मुस्लीम धर्म ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला व तेही मुस्लिमत्वावर दावा ठेवून!

दलवाई आणि इतिहास

इतिहास मानवी समूहाच्या अस्मितानिर्मितीत महत्त्वाची भूमिका पार पाडतो. ज्या समाजाला इतिहास नसतो किंवा ज्ञात नसतो असा समाज इतिहास शोधण्याचा प्रयास करतो. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैनांना इतिहास आहे. त्यातून प्रेरणा कोण शोधत नाही? दलवाई मुसलमानांच्या इतिहासाला पाशवी संबोधतात. यातून हिंदुत्ववाद्यांना प्रेरणा मिळते. हॉब्जसारख्या राजकीय विचारवंताने माणसाला कोणत्याही धर्माचे लेबल न लावता माणसाची केवळ विकृत बाजू सादर केली आहे. गांधीजींनीही माणसाला धर्माचे लेबल न लावता माणसाला सद्गुणांचा व दुर्गुणांचा संमिश्र पुतळा म्हटले आहे. दलवाई इतिहासाचा विपर्यास करण्याची कारणे कोणती हे त्यांचे देव्हारे माजविणाऱ्या व्यक्तींनी कधी शोधली आहेत काय? इतिहासात पाशवी वृत्तीचे प्रदर्शन सर्वधर्मीयांनी केले आहे.

दलवाईंचे मित्र कुरुंदकरांनीच निवेदन केले – 'इ.स. ३४६ला कॉन्स्टंटाईनने आज्ञा केली की, ख्रिस्ती धर्ममताखेरीज इतर सर्व धर्म बंद करण्यात आले आहेत. इतर धर्मावर श्रद्धा ठेवणे, इतर धर्मांची पूजागृहे चालू ठेवणे हा प्राणदंडाचा गुन्हा मानण्यात आला... ख्रिस्ती धर्माचा वरवंटा युरोपवरून पुढे दोनशे वर्षे फिरविण्यात आला.'[११] 'हा हेतू लक्षात घेतल्याशिवाय अल्बुकर्कने मुसलमानांच्या कत्तली का केल्या याचा उलगडा होणार नाही.'[१२] 'एकीकडे मार्टिन ल्युथर पोपशी भांडत होता, पण दुसरीकडे हाच नवा संत ज्यूंची मंदिरे जाळा, पाठशाळा उद्ध्वस्त करा, त्यांच्या जिभा उपटून टाका, असा उपदेश करीत होता.'[१३] 'या सर्वांचा कळस म्हणजे पोपच्या पाठिंब्याने निर्माण झालेली इन्क्विझिशन ही धार्मिक छळ करणारी संघटना! या संघटनेने धर्मच्छळाने निदान एक कोट माणसे मारली असावीत असा अंदाज वॉल्टेअरने केला.'[१४] बौद्धांबद्दल कुरुंदकर म्हणतात, 'बौद्ध झाल्याने माणूस कमी हिंस्र होत नसतो. तो आपल्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानातून राज्य टिकविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या हिंसेला धार्मिक परवानगी मिळवून देतो.'[१५]

कुरुंदकर लिहितात, 'नष्ट झालेल्या असीरिया, बाबिलोन, इजिप्त या जुन्या संस्कृती सोडल्या, तर शिल्लक राहिलेल्या धर्मसंस्कृतीत जंगलीपणाचा पहिला आदर्श ख्रिश्चनांनी घालून दिला, असे म्हणावे लागेल.'[१६] हिंदूंबद्दल ते काही वेगळे सांगत नाही. 'एवढा चिवट असलेला हिंदू समाज कमालीचा असहिष्णु आणि तितकाच कमालीचा निर्दय अन् क्रूर असूनही उदारमतवादी व सहिष्णु म्हणून ओळखला जातो! तोंडाने सर्वधर्मी समानत्व आणि आत्म्याचे अद्वैत सांगणाऱ्या या समाजाने निदान दोन हजार वर्षे काही कोटी आदिवासींना संस्कृतीच्या बाहेर ताटकळत ठेवलेले होते आणि उरलेल्या काही कोटी अस्पृश्यांना संस्कृतीच्या कक्षेच्या आत गुलाम करून टाकलेले होते. स्त्रियांची गुलामी हा पुन्हा वेगळाच भाग आहे. लक्षावधी रुपये खर्चून मीनाक्षीसुंदरम् आणि वेरुळची देवालये निर्माण करणाऱ्यांनी समाजात वरिष्ठ वर्गाच्या उपभोगासाठी दासी, बटकी आणि वेश्या यांचा मिळून जगातील सर्वांत मोठा समूह निर्माण केला होता! उदार हिंदू संस्कृतीत इंग्रजांनी कायद्याने बंद करीपर्यंत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या

मध्यापर्यंत माणसांच्या खरेदीविक्रीचे बाजार गुरांच्या आठवडी बाजाराप्रमाणे भरत असत! एकेक पुण्यश्लोक राजा केवळ धर्मप्रेमाखातर पाचपाचशे मुली देवळांना देवदासी म्हणून नजर करीत असे! शत्रूची बायका-मुले पकडून गुलाम करावी ही प्रथाही भारतात होती.'[१७]

'एस. पी. अय्यर 'सेक्युलॅरिझम अ‍ॅन्ड स्कूल टेक्स्टबुक्स' या लेखात म्हणतात, 'मध्ययुगीन मुस्लीम राजांचे क्रौर्य आणि हिंदू राजांचे क्रौर्य तोडीस तोड होते.'[१८] भारतातील 'सुप्रसिद्ध चाणक्य उर्फ कौटिल्याने त्याच्या अर्थशास्त्रात राजाने देवळांच्या संपत्तीचे अपहरण कसे करावे हे स्पष्टपणे लिहून ठेवलेले होते. काश्मीरच्या हर्षदेव राजाने मंदिरे लुटण्यासाठी 'देवोत्पातन' खातेच उघडले होते... कल्हणच्या 'राजतरंगिणी' या ग्रंथात (हे) वर्णन आहे.'[१९]

काही ठिकाणी हमीद दलवाईंनी ज्या इतिहासकारांना मोडीत काढले आहे त्यापैकी एक इतिहासकार डॉ. इरफान हबीब आहेत. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इतिहासजतज्ज्ञ मानले जातात. धर्माचा इतिहास कसा लिहिला पाहिजे याविषयी त्यांचे मत चिंतनीय आहे - 'धर्माच्या इतिहासाचा अभ्यास गांभीर्याने व्हावयास हवा. इतिहासाच्या इतर पैलूंच्या अभ्यासासाठी आपण चिकित्सेच्या ज्या वैज्ञानिक वैश्विक कसोट्या लावतो त्याच या अभ्यासाला लावावयास हव्याच. धर्माचे विश्लेषण धर्म ज्या अटी सादर करतो, त्या अटींवर व्हावे आणि त्याचे अनुयायी जी विशिष्ट निर्विवाद सत्ये जाहीर करतात ती स्वीकृत करून व्हावे, अशी जी मागणी धर्माचे अनुयायी करतात ती हास्यास्पद आहे. कोणताही धर्म वा कोणतीही धर्मश्रद्धा स्वयंसिद्ध सत्य किंवा असत्य नसते; निखळ अभिजात आणि ईश्वरदत्त नसते, पूर्वबाब, प्रभाव, परिवर्तन आणि विकास यापासूनही मुक्त नसते.'[२०]

'कोणत्याही' धर्माच्या इतिहासाचे शास्त्रीय विश्लेषण कसे करावे याचा वस्तुपाठ इरफान हबीब यांनी सादर केला आहे. कोणत्याही धर्माच्या इतिहासाला हे लोखंडाचे चणे चावावयाचे आहेत.

दलवाई अनेकदा आत्मप्रशंसा करतात. अनेक मान्यवर साहित्यिकांनी त्याला आत्मविश्वासाचा दर्जा दिला आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेच्या संदर्भात दलवाई म्हणतात, 'मी अभिमानाने सांगू इच्छितो की; मुस्लीम धर्माच्या तेराशे वर्षांच्या इतिहासात मुस्लीम धर्म चिकित्सा करणारी ही पहिली संस्था असावी.'[२१] 'इज्तिहाद' धर्मचिकित्सा करणारे मंडळच होते. इस्लाममधील जे अनेक पंथ निर्माण झाले त्याला कारणही धर्मचिकित्साच होती. या खेरीज एक महत्त्वाची बाब की, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' हे नाव 'सत्याचे धर्मावरून' प्रकार पडू शकतात असा अर्थ ध्वनित करते. या सर्वांपेक्षा अधिक खटकणारा मुद्दा म्हणजे धर्माची चिकित्सा करणारे लोक कोण? धर्माची चिकित्सा मुस्लीम धर्मपंडितांनीच करावी असा आग्रह अजिबात नाही. परंतु इस्लामचा अभ्यास असणारा एखादा माणूस तरी त्यात असायला हवा होता. इस्लामच्या स्रोतांपर्यंत पोहोचण्याची तसदी दलवाईंनी घेतली नाही. प्राच्यविद्या पंडितांनी जे हिंदू आणि मुस्लीमविरोधी लेखन केले आहे त्याच्या अत्यंत जुजबी वाचनाचे जेमतेम प्रतिबिंब दलवाईंच्या लेखनात व बोलण्यात पडलेले दिसते. ऐकीव माहितीसुद्धा (जिचे संदर्भ दिलेले नाहीत) भरपूर प्रमाणात आहे. असगरअली इंजिनिअरसारखी एकही मातब्बर व्यक्ती या मंडळात नव्हती.

दलवाई गौरव वर्षा

दलवाईंच्या कार्याचे मूल्यमापन मोठ्या लेखकांनी व नेत्यांनी केले आहे. परंतु त्यांच्या विचारांचे मूल्यमापन राहून गेले आहे. म्हणजे मूल्यमापनाच्या नावाखाली गौरवग्रंथाचे लेखन झाले आहे. समाज प्रबोधन पत्रिकेतील एका लेखात वसंत पळशीकरांनी 'मुस्लीम जातीयवादाची हमीद दलवाईकृत मीमांसा' हा लेख लिहिला होता; तो प्रा. तांबोळींनी 'हमीद दलवाई' : क्रांतिकारी विचारवंत या संपादित केलेल्या पुस्तकात समाविष्ट केला. दलवाईंविषयी जे दडपण निर्माण केले जाते त्यापासून हा लेख मुक्त आहे.

दलवाईंवरचे गौरवलेख वाचल्यानंतर मुस्लीम समाजात विनाकारण जन्माला आलो असे सहृदय मुस्लीम वाचकास वाटल्याशिवाय राहणार नाही. 'हमीद दलवाईंचे बहुमोल कार्य' हा लेख नानासाहेब गोरेंनी लिहिला. महाराष्ट्राच्या अर्वाचीन सामाजिक इतिहासात ब्राह्मणी वर्चस्वावर घणाघाती प्रहार करून बहुजन समाजाला त्याच्या घोर निद्रेतून जागे करणारे जसे महात्मा फुले, दलितांना तुम्ही पशू नाहीत माणसे आहात म्हणून माणुसकीच्या अधिकारासाठी लढायला तयार व्हा अशी तुतारी फुंकणारे जसे डॉ. आंबेडकर तसेच भारतामधील अंधपरंपरांच्या आणि रूढींच्या बेड्यांत अडकून पडलेल्या मुसलमानांना या गंजलेल्या बेड्या म्हणजेच पैगंबराचा इस्लाम अशा भ्रमातून सोडविण्याचा प्रयत्न शर्थीने सुरू करणारे दिवंगत हमीद दलवाई. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि दलवाई यांचा उल्लेख नानासाहेब आदरार्थी करतात तर पैगंबारांचा (स्व) एकेरी! नानासाहेब एक सुसंस्कृत समाजवादी म्हणून सुपरिचित आहेत. तसे सर्व समाजवादीच सुसंस्कृत आहेत. दलवाई-गौरव वचनांमधून परंपरा आणि अंध रूढींमध्ये काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंतचे मुसलमान अडकलेले आहेत (गंजलेल्या बेड्यांमध्ये) व त्राता आहेत हमीद दलवाई! दलवाईंची ही भारतभरची कर्तबगारी नक्कीच भारताच्या कानाकोपऱ्यात नोंदविली गेली असेलच! मुस्लीम वगळता भारतातील सर्वधर्मीय लोक रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांपासून मुक्त आहेत! महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांचे कार्य इतके व्यापक आहे की, त्यांच्या पंक्तीला दलवाईंना बसविणे हे मनाला पटविणे जर जडच जाते.

नानासाहेब, दलवाईंसकट सर्व समाजवाद्यांच्या मुस्लिमां-संबंधीच्या विचारांचे आकलन होणे गरजेचे आहे. भारतीय

स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास मुस्लीम लीगचा जन्म झाल्यापासून मुसलमानांच्या हटवादाच्या अतिरेकाचा इतिहास आहे हे वादातीत आहे. पण काँग्रेस चळवळीतही किती कट्टर हिंदुत्ववादी घटक होते याचीही थोडीशी नोंद घ्यायला पाहिजे. मालवीयांपासून टंडनपर्यंत किंवा त्यापुढे जाऊन जी. बी. पंत आणि सरदार पटेलांपर्यंत हिंदुत्ववाद्यांची परंपरा आहे. १८८५पूर्वी जे स्वातंत्र्यलढे झाले त्यात मुसलमानांचा सहभाग आहे. डॉ. य. दि. फडके आणि डॉ. सांतिमोय रॉय यांनी यावर पुस्तके लिहिली आहेत.

भारताची फाळणी टाळण्यासाठी (व्यंग्य करीत) दलवाईंनी उपाय सुचविला – 'तसे म्हणायचे तर सर्वांनी हिंदू होऊन किंवा मुसलमान होऊन फाळणी टळली असती.'[२२] दलवाईंचा कोणता युक्तिवाद गंभीर आहे हे ठरविणेही मोठ्या जिकीरीचे काम असते. खरे म्हणजे त्यांना मुसलमानांनी हिंदू व्हावे असेच म्हणायचे असेल. अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांचा धर्म स्वीकारणे हा काटकसरीचाच मार्ग होता! दलवाईंपूर्वी आणि स्वातंत्र्यापूर्वी अमेठीचे प्रिन्स म्हणाले होते – 'शुद्धीने सगळे मुसलमान एकदाचे हिंदू झाले की भारताच्या स्वातंत्र्याला जगातील कोणतीही शक्ती रोखू शकणार नाही.'[२३] हमीद दलवाईंनी तर हरदयाळांचे वाक्यच उच्चारले आहे. वैतागून हरदयाळ म्हणाले, 'हिंदूनो! एक तर तुम्ही मुसलमान व्हा नाही तर मुसलमानांना हिंदू करा.'[२४] या मानसिकतेने कोणत्याही हिंदू-मुस्लीम प्रश्नाकडे पाहाणे आजच्या काळात कोणत्याही भारतीयाच्या हितात नाही.

इस्लामवर, प्रेषितांवर (स्व) आणि मुसलमानांवर टीका करण्याचा हक्क दलवाईंना, नानासाहेबांना आणि इतरांना आहेच. त्यांच्यापेक्षा जास्त कडवट नव्हे तर अभद्र टीका पूर्वी झाली आहे. आजही होते आहे. दलवाई असेही म्हणतात – 'मी मुसलमान आहे, पण माझा ईश्वरावर विश्वास नाही आणि म्हणून महंमद ईश्वराचा प्रेषित होता आणि कुराण हा दैवी संदेश आहे या गोष्टीवरही माझा विश्वास नाही. प्रेषिताविषयी मला आदर आहे आणि इतिहासात उदयाला आलेल्या सर्वश्रेष्ठ व्यक्तींपैकी ते एक आहेत असे मी मानतो; पण प्रेषित स्वतःच सांगत त्याप्रमाणे ते 'केवळ एक माणूस' होते आणि मानवी प्रकृतीत असलेली दौर्बल्ये त्यांच्याही ठिकाणी होती.'[२५]

प्रेषित (स्व) माणूस होते एवढेच नव्हे तर जगातील सर्व प्रेषित माणसेच होती व एकेश्वराचा एकच संदेश घेऊन आलेली होती आणि ईश्वराचे दास म्हणून वावरली असे कुरआनमध्ये अनेकदा आलेले आहे. दलवाईंच्या 'मुसलमान असणे – ईश्वर नाकारणे' या अंतर्विरोधाचा मुद्दा आपण चर्चिला आहे. हमीद दलवाईंच्या लेखनात – त्यांच्या (प्रेषितांच्या-स्व) कर्तृत्वाबद्दल... गौरवपूर्ण उल्लेख आहेत.'[२६] असा उल्लेख भाई वैद्यांनी केला आहे. परंतु प्रेषितांना (स्व) दलवाई सर्वश्रेष्ठ व्यक्तींपैकी एक मानतात याची कारणमीमांसा मला वाचायला मिळाली नाही. उलट प्राच्यविद्यापंडितांनी केलेली टीकाच त्यांनी पुन्हा पुन्हा केली आहे. या टीकेला उत्तरेही दिली गेली आहेत, परंतु त्यांची नोंद दलवाईंनी कुठे घेतली असल्याचे दिसत नाही.

प्रेषितांवरील (स्व) चर्चा

मुसलमानांना प्रेषित मुहंमद (स्व) यांच्याविषयी खूप आदर आहे. प्राच्यविद्यापंडितांचे काही साहित्य दलवाईंनी वाचल्यामुळे वा/आणि ऐकल्यामुळे या आदराची कारणे त्यांच्यापर्यंत पोहोचलेली नाहीत. मराठी विश्वातही ती फारशी आली नाहीत. त्यामुळे दलवाईंच्या टीकेसह त्याची थोडी चर्चा गरजेची आहे. दलवाईंनी आरोप केला आहे – 'स्वतः प्रेषितांनीही मक्कावासीयांशी केलेल्या कराराचा भंग केला आहे. मक्कावासीयांच्या व्यापारी काफिल्यांवर हल्ले न करण्याचे आश्वासन प्रेषितांनी मदिनेत असताना दिले होते. परंतु अबू सूफियानच्या काफिल्यावर त्याने हल्ला केला आणि त्यातून बदरची लढाई उद्‌भवली.'[२७] दलवाईंनी हे कुठे तरी वाचले असणार हे उघड आहे. परंतु स्रोत दिलेला नाही.

प्रेषित (स्व) कराराचा भंग करतात हे सांगण्याची दलवाईंना खूप घाई झाली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी दोन ऐतिहासिक प्रसंगांची गुंतागुंत केली आहे. आज जगातील अग्रणी धर्मभाष्यकारांमध्ये असणाऱ्या कॅरेन आर्मस्ट्राँग हा प्रसंग त्यांच्या 'मुहंमद' या पुस्तकात पुढीलप्रमाणे सांगतात, 'हिवाळी महिन्यांमध्ये – ६ जानेवारी ६२४ला कुरेशांनी त्यांचे काफिले दक्षिणेकडे पाठविले, जेणेकरून त्यांना मदिनेकडून जावे लागणार नाही. त्यांचे ध्यानाकर्षण करण्यासाठी प्रेषित मुहंमदांनी (स्व) दक्षिणेकडे जाणाऱ्या या गटावर हल्ला करण्यासाठी ९ लोकांचा गट पाठविला. पवित्र महिन्यांपैकी एक रजब महिन्याच्या अगदी शेवटचा हा कालावधी होता. या महिन्यात युद्ध वर्ज्य मानले जाते. नखलाह येथे डेरा देऊन थांबलेल्या काफिल्याजवळ मुस्लीम पोहोचले. आता काय करावे? रजब संपण्यासाठी मुस्लीम थांबले असते, तर उपसर्ग न पोहोचता काफिला तहाच्या (संकेताच्या) कालावधीत निघून गेला असता. गटाने हल्ला करण्याचे ठरविले. पहिला बाण सुटला. (काफिल्यातील) एक व्यापारी ठार झाला. बाकीचे पळाले. दोन व्यापाऱ्यांना पकडण्यात आले. त्यांना व त्यांच्या मालाला मदिनेस आणले गेले. **या जेत्यांचे (मदिनेत) स्वागत झाले नाही. उलट लोकांना धक्का बसला. प्रेषितांना यावर प्रतिक्रिया कशी द्यावी हे समजले नाही.**[२८] **कुरआनमधील अल् बकराहची २१७वी आयत अवतरली (जाड ठसा माझा).'**

यात एक मुद्दा स्पष्ट झाला की, दलवाई सांगतात त्याप्रमाणे 'त्याने' (प्रेषितांनी)–(इथेही प्रेषितांचा एकेरी उल्लेख – याशिवाय प्रबोधन होत नसावे) स्वतः हा हल्ला केला नाही. दुसरी गोष्ट जेत्यांचे स्वागत झाले नाही. आर्मस्ट्राँग पुढे म्हणतात, 'त्यांनी (प्रेषितांनी) मक्कीय धर्माचा त्याग तर केला होता. पवित्र महिन्यात युद्ध न करण्याची प्रथाही सोडण्याचा (jettison) विचार ते करीत असावेत. परंतु यात संशय घेण्यासारखी बाब

अशी की, प्रेषितांनी (पवित्र महिन्यात) युद्ध न करण्याच्या रूढीचा पूर्वी कधी निषेध केलेला नव्हता. या संदर्भातील स्रोत संतोषजनक वाटत नाहीत. Muhammad had discovered that however idealistic your war might ce at the outset, something distasteful is likely to occur sooner rather than later.'[२९]

कुरआनमधील अल् बकराहमधील २१७व्या आयतीचा अनुवाद - (आर्मस्ट्राँग यांनी मुहंमद असद यांच्या 'दी मेसिज ऑफ कुरआन' मधून उद्धृत केला आहे) - **'ते (कुरैश) तुम्हाला (मुस्लिमांना) तुमची श्रद्धा तुम्ही सोडल्यापर्यंत, तुमच्याशी संघर्ष केल्याशिवाय थांबणार नाहीत आणि जोपर्यंत निषिद्ध महिन्यांमध्ये युद्ध करण्याची बाब विचाराधीन आहे (तसे) युद्ध निषिद्धच आहे. परंतु ईश्वरी पंथापासून लोकांना दूर करणे ईश्वरापासून आणि प्रार्थनागृहापासून (काबा) लोकांना हाकलणे ईश्वराच्या नजरेत जास्त वाईट आहे कारण जुलूम जबरदस्ती जीवे मारण्यापेक्षा अधिक भयंकर आहे (जाड ठसा माझा).**[३०]

या व बद्रच्या युद्धात (आर्मस्ट्राँग यांना skirmishes चकमकी म्हणतात). दलवाई म्हणतात तशी कडी-साखळी नाही. नंतरच्या काफिल्यात कुरेशांच्या बाजूने महापराक्रमी अबू सूफीयान होते. बद्रच्या लढाईत मुस्लिमांनी अबू सूफीयान यांचा पराभव केला. पुढे ते मुस्लीम झाले. अनेक लढायांमध्ये त्यांनी पराक्रम गाजविला. करार पाळण्यासंबंधी प्रेषितांची एक हदीस मौ. मुहंमद जकरिया यांनी सारांशात सादर केली आहे. तीन बाबी अनिवार्य आहेत. (१) मातापित्यांबरोबर चांगले राहा. ते मुस्लीम असो की, काफिर; (२) कुणाशीही करार केला असेल तर तो पूर्ण करा. करार मुसलमानाशी केलेला असो वा काफिराशी आणि (३) तुमच्याकडे ठेव अमानत म्हणून ठेवली असल्यास ती परत करा. मग ती ठेव मुस्लिमाची असो वा काफिरची.[३१] याच्या पुढे उद्धृत केले आहे - प्रेषित (स्व) सांगतात, 'जी कौम कराराचा भंग करते तिच्यावर शत्रू विजय मिळवितो.'[३२]

दलवाई करारभंगाचा जो उल्लेख करतात त्या संदर्भात इब्न हिशाम आणि इब्न इसहाक (यांच्या पुस्तकाचा अनुवाद गियाँम-Guillaume यांनी केला आहे) यांनी निवेदन केले आहे की, लोकांना काफिल्याची केवळ माहिती आणण्यासाठी पाठविले होते. पण त्यांनी काफिल्यावर हल्ला केला. हा हल्ला रजबमध्ये झाला की, पुढच्या महिन्यात शाबानमध्ये याविषयी संशय आहे. ज्यू, कुरैश आणि पाखंड्यांनी मुसलमानांविरुद्ध कांगावा केला की, मुसलमानांनी पवित्र महिन्यात हल्ला केला.[३३]

प्रबोधन करताना शिव्याशाप खाणे, अपमान सहन करणे इत्यादी बाबी ओघाने येतात. शेले-इमले देऊन कुणा समाजसुधारकाचा सत्कार होणे शक्यच नाही. सर सय्यद अहमदखान, मोहसिनुल मुल्क, मौलाना गोरखपुरी, शेख अब्दुल्ला (उत्तर प्रदेश) यांनी कमी शिव्या खाल्लेल्या नाहीत. डॉ. नरेन्द्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे आणि कलबुर्गी यांना तर हौतात्म्य प्राप्त झाले. जमाना किती बदलला हे या हिंसेने सिद्ध केले.

प्रेषितांच्या (स्व) लोकप्रियतेचा मुद्दा आता चर्चेला घेऊ. दलवाईंचे असे म्हणणे आहे की, मुसलमानांच्या सर्व धर्मश्रद्धा प्रेषित मुहंमदांभोवती एकवटलेल्या आहेत हे हास्यास्पद आहे.[३४] इस्लामबद्दलच्या ऐकीव माहितीमुळे ते हास्यास्पद विधाने करतात. जगामध्ये जे धर्म आहेत त्यांच्या श्रद्धा कोणाशी बांधल्या जातील? हिंदूंच्या प्रेषितांशी, मुस्लिमांच्या भगवान श्रीकृष्णाशी, ख्रिश्चनांच्या बुद्धांशी आणि बौद्धांच्या येशूशी? मुसलमान म्हणवून घेण्यापलीकडे दलवाईंना मुसलमानांचे काय चालते? व्यक्तिपूजेला प्रेषित मुहंमदांनी (स्व) प्रखर विरोध केला आहे. बसलेल्या समूहामध्ये ते (स्व) गेल्यानंतर त्यांचे (स्व) अनुयायी आदर दर्शविण्यासाठी उभे राहात. असे करण्यास प्रेषितांनी प्रतिबंध केला. भारतात इस्लामचे आगमन झाल्यावर एतद्देशीय संस्कारांमुळे मुस्लीम दर्ग्यांचे दर्शन घेऊ लागले. प्रेषित (स्व) अल्लाहचे दास आणि प्रेषित होते. ईश्वराने एकेश्वराचा संदेश देण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात प्रेषित पाठविले. या सर्व प्रेषितांवर श्रद्धा असल्याशिवाय माणूस मुस्लीम होऊच शकत नाही.

प्रेषितांच्या (स्व) दिव्यत्वामुळे, सत्यवादित्वामुळे, प्रामाणिकपणामुळे, संपूर्ण मानवजातीच्या प्रेमामुळे, मुस्लिमांसाठी केलेल्या त्यागामुळे, त्यांच्यासाठी त्यांनी सोसलेल्या यातनांमुळे आणि माणसाला ईश्वराचा जो परिचय करून दिला त्यामुळे त्यांच्यावर (स्व) जगातील मुस्लीम समाज जिवापाड प्रेम करतो. वर उल्लेखिलेल्या बाबी कविकल्पना नाहीत. याला इतिहास आहे. एकेश्वरी इस्लामचा प्रचार केल्याने त्यांना 'मक्का' ही मातृभूमी सोडावी लागली. मक्का शहरात त्यांना प्रेषितत्त्व मिळण्यापूर्वी ते सत्यवचनी, अमीन (अमानतदार) म्हणून सर्व कुरैशींना परिचित होते. त्यांच्या प्रत्येक शब्दावर त्यांचा विश्वास होता. त्यांना प्रेषितत्त्व प्राप्त झाल्यावर आणि त्यांनी मूर्तिपूजेस विरोध केल्यानंतर आणि एकाच ईश्वराची उपासना करा असा उपदेश द्यायला सुरुवात केल्यावर त्यांचा अतोनात छळ झाला. कुरैश त्यांना शिव्याशाप द्यायला लागले. त्यांना पागल ठरवून गल्लीबोळात दगड मारले जात. मक्केमधील काबात त्यांना उपासना करू दिली जात नसे. एकदा तर काबागृहात ते सजद्याच्या स्थितीत असताना त्यांच्या मानेभोवती कापलेल्या उंटाचा कोठा टाकण्यात आला. जनावराच्या पोटात आतड्यांजवळ जनावरांची विष्ठा कोठ्यात साठलेली असते. त्यांच्यावर घाण फेकली जाई.

प्रेषित (स्व) आणि त्यांच्या अनुयायांना तीन वर्षे वाळीत टाकण्यात आले होते. तीन वर्षे ही मंडळी झाडपाल्यावर आणि काहींना यांची दया आल्याने त्यांनी पाठवलेल्या धान्यावर

जगली. पुढे प्रेषितांच्या दोन मुलींना तलाक देण्यात आला. त्यांच्या (स्व) एका मुलीचे पाय दोन उंटांच्या पायांना बांधून ते विरुद्ध दिशांना पळवून तिचे दोन तुकडे करण्यात आले. भर दुपारच्या गरम वाळूवर प्रेषितांचे (स्व) अनुयायी बिलाल आणि खब्बाब यांची चरबी वितळेपर्यंत त्यांना लोळविले जाई. हा इतिहास आहे. प्रेषितांनी (स्व) सहन केलेल्या यातना मुस्लिमांसाठीच होत्या. यावर एखादे पुस्तक होईल. त्यांच्या (स्व) मृत्युसमयी त्यांच्या ओठावर अंतिम शब्द – या अल्लाह नव्हते! तर 'या उम्मती या उम्मती' (माझ्या धर्माचे अनुयायी! माझ्या धर्माचे अनुयायी!) हे होते. मुसलमानांच्या मोक्षाची अगदी जगाच्या अंतापर्यंत जन्म घेणाऱ्या विश्वातल्या सर्व मुसलमानांच्या मोक्षाची काळजी त्यांनी केली.

दलवाईंनी व त्यांच्या समाजवादी मित्रांनी हा इतिहास वाचला असता तर नानासाहेबांच्या भाषेत – प्रेषितांच्या गंजलेल्या बेड्या मुसलमानांना प्राणाहून प्रिय का आहेत याचे उत्तर मिळाले असते. जनतेच्या कल्याणासाठी जातिधर्मासाठी ज्या महान भारतीय नेत्यांनी आपले जीवन व्यतीत केले त्यांच्या विरोधात त्यांचे अनुयायी 'ब्र' काढू देत नाहीत. नांदेडचा माझा एक चावट मित्र मला कधी कधी सांगायचा की, मराठवाड्यातल्या एका तरी प्रबोधनकाराने गुरुद्वारामध्ये बोडके जाऊन दाखवावे!

हे असे असले तरी मुसलमानांनी पत्नीवर अत्याचार करावेत असे मुळीच नाही. त्रिवार तलाक द्यावा असेही नाही. थोडक्यात तलाक हा पतीच्या लहरीवर अवलंबून राहू नये. इस्लामला बदनाम करण्याची संधी मुस्लिमांनी देऊ नये. आतापावेतो मुस्लिमांना वस्तुस्थितीची जाणीव व्हावयाची गरज होती. मुस्लिमांमध्ये सुधारणा होत नसेल तर मुस्लीमच कायद्याला हस्तक्षेप करण्यास निमंत्रण देतील.

दलवाईंनी प्रेषितांवर केलेली टीका नवीन नाही. इस्लामला उद्ध्वस्त करण्याचे महान कार्य एक मुस्लीम करतोय हे त्यांना जनमानसावर ठसवायचे आहे ही बाब त्यांच्या साहित्यात सर्वदूर संचार करतेय असे स्पष्ट जाणवते. हिंदूधर्माचा आणि धर्म या संकल्पनेचा पाया उखडणारे आगरकरांसारखे लोक आहेत ज्यांनी हिंदू म्हणवून घेण्याचा कधी आग्रह केला नाही. हिंदू समाजात हिंदू म्हणवून घेऊन परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या गांधीजींचा उल्लेख खास म्हणून केला आहे. कारण काशीच्या पंडितांकडून ते पाखंडी ठरविले गेले होते. परंतु हिंदू धर्माची किती तरी तत्त्वे त्यांनी आचरणात आणली. गीतेचा अन्वयार्थ लावला. रामाला ते पुरुषोत्तम मानीत. उपनिषदांचा त्यांनी अभ्यास केला होता. ईशोपनिषदावर, रामराज्यावर त्यांचे प्रेम होते. हिंदू म्हणवून घ्यायला त्यांच्याकडे किती भांडवल होते. हिंदू समाजातील नकारात्मकता नाकारत त्या धर्मातील सकारात्मकता त्यांनी यशस्वीपणे शोधली. या दिशेने हमीद दलवाईंचं एक छोटंसं पाऊल तरी पडले आहे का, हा प्रश्न विचारलाच पाहिजे.

प्रेषितांच्या (स्व) अकरा विवाहांचा प्रश्न, जो नेहमी उपस्थित केला जातो, दलवाईंनी उपस्थित केला आहे. या प्रश्नाची व तदनुषंगाने उद्‌भवणाऱ्या इतर काही प्रश्नांची चर्चा करू. मुस्लीम व्यक्तीस चार बायका करण्याची परवानगी कुरआन देते परंतु प्रेषितांनी अकरा विवाह केले, हे कसे? याचे तांत्रिक उत्तर असे की, अशी परवानगी कुरआनमध्येच आली आहे. सूरह अहजाबच्या ३३ ते ५० या आयतींमध्ये ही परवानगी विशद केली आहे. प्रेषित (स्व) २५ वर्षांचे असताना त्यांनी ४० वर्षे वयाची विधवा हजरत खदिजा यांच्याबरोबर पहिला विवाह केला. त्या हयात असताना त्यांनी दुसरा विवाह केला नाही.

प्रेषितांनी (स्व) त्यांच्या मानसपुत्राने-जैदने त्याच्या पत्नीस जैनब हिला तलाक दिल्यानंतर तिच्याशी विवाह केला. या विवाहावर दलवाईंनी आक्षेप घेतला आहे. या घटनेची पार्श्वभूमी अशी -

अरबांमध्ये मानसपुत्र आणि मानसकन्या आपल्या कुटुंबात सामील करून घेण्याची पद्धत पूर्वापार चालत आलेली होती. गुलाम म्हणून घेतलेल्या जैद यांना प्रेषितांनी (स्व) मुलगा मानले होते. या पद्धतीने समाजात काही समस्या निर्माण केल्या होत्या. एक तर अशा मुलांना व मुलींनाच नव्हे तर त्यांच्या सख्ख्या भावाबहिणींना मानसपित्याच्या संपत्तीत वाटा मिळू लागला होता. त्याचप्रमाणे मानलेल्या मुलींशी कुटुंबात लैंगिक संबंधही निर्माण झाले होते. त्यामुळे अशा नात्यांमध्ये आणि रक्तसंबंधांच्या नात्यांमध्ये फरक करण्याची आवश्यकता भासू लागली. विशिष्ट परिस्थितीत वागणुकीच्या मार्गदर्शनासाठी कुरआनचे अवतरण होत गेले आहे. यासाठी कुरआनच्या आयतींचे अवतरण होऊन ही नाती रद्द झाली.

सूरह अहजाबच्या ३३ ते ३७ या आयतींमध्ये आले की, ''...आम्ही तिचा (जैनबचा) तुमच्याशी विवाह केला की, जेणेकरून ईमानधारकांवर आपल्या मानलेल्या पुत्रांच्या पत्नींच्या बाबतीत कोणतीही अडचण राहू नये.'' ही आज्ञा झाल्यानंतरही ती उघड करण्याचा संकोच प्रेषितांना (स्व) वाटला. परंतु ही पद्धत बंद होण्याची गरज होती. टी.पी. ह्यूज यांनी 'डिक्शनरी ऑफ इस्लाम'मध्ये याचा विपर्यास केला आहे.

जैनब, प्रेषितांची (स्व) आतेबहीण होती. तिला त्यांनी (स्व) पाहिले नव्हते असेही नाही. तिचा विवाह जैदशी लावण्यात त्यांनीच (स्व) पुढाकार घेतला होता. ती कुलीन कुरैश घराण्यातील होती आणि जैद गुलाम होते. हा विवाह टिकला नाही. कुरबुरी वाढून तलाक झाला. आतेबहिणीशी विवाह जायज-वैध-आहे. प्रेषित (स्व) तिच्याशी अगोदर विवाह करू शकले असते. प्रेषितांचे (स्व) जीवन हा उघडलेला ग्रंथ आहे. त्यांच्या जीवनातील कोणतीही बाब ही लपवून ठेवलेली नाही. केवळ यासाठी कुरआनमध्ये अवतरलेल्या काही आयतींचा अर्थ या ठिकाणी देतो. सूरह अहजाब मध्ये ३३-५२ या आयतींमध्ये आज्ञा करण्यात आली - 'यानंतर तुमच्यासाठी (स्व) अन्य स्त्रिया हलाल नाहीत आणि याचीही परवानगी नाही, की त्यांच्या जागी अन्य पत्नी आणाव्यात मग त्यांचे सौंदर्य तुम्हास कितीही का पसंत असेना, तथापि दासींची तुम्हाला परवानगी आहे. अल्लाह प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवणारा आहे.' ही आयत ५२वी आहे. या आयतीतील - 'दासींची तुम्हाला परवानगी आहे' याचा तपशील संक्षिप्तात देतो : यानंतर मकूकस या ख्रिश्चन राजाकडून हजरत मारिया कबातिया ही सुंदर तरुणी प्रेषितांना दासी म्हणून भेट देण्यात आली. अशी पद्धती त्या काळात सर्वत्र रूढ होती. हजरत मारिया ख्रिश्चन होत्या. त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. त्या चारित्र्यसंपन्न व उदात्त स्वभावाच्या होत्या. त्या प्रेषितांच्या कुटुंबात सामील झाल्या. हजरत आयेशा (प्रेषित मुहंमद-स्व यांच्या पत्नी) म्हणतात, 'मला हजरत मारियांचे सौंदर्य, त्यांचे गुण व त्यांची उदात्तता याबद्दल जितका हेवा वाटे तितका कुणाचाच वाटला नाही.'[३५] प्रेषितापासून (स्व) त्यांना एक मुलगा झाला. परंतु अठरा महिन्यांचा असताना त्याचा मृत्यू झाला. प्रेषितांचे (स्व) मारियावर फार प्रेम होते. प्रेषितांच्या (स्व) निर्वाणानंतरही त्यांचा खलिफाही खूप आदर करीत. मारियांच्या मृत्यूनंतर 'जन्नतुल बकी'मध्ये त्यांना दफन करण्यात आले. अब्दुर्रशीद खान यांनी प्रेषितांच्या विवाहांवर एक पुस्तक लिहिले आहे. या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद - 'मुहम्मद (स्व) यांचे विवाह आणि दैवी कार्य' जिज्ञासूंनी अवश्य वाचावा.

प्रेषितांना (स्व) खूप कामवासना होती हे दर्शविण्यासाठी त्यांचे टीकाकार या बाबी अधोरेखित करण्याचा प्रयत्न करतात. दलवाईही हाच प्रयत्न करतात. या संदर्भातील वस्तुस्थिती वर मांडली आहे. सुशिक्षित मुसलमानांना वाचून आणि सर्वसामान्य मुस्लिमांना ऐकून प्रेषितांची 'सवाने उमरी' (सच्चरित्र) माहीत आहे. मी नुकतेच म्हटल्याप्रमाणे प्रेषितांचे (स्व) जीवन उघड्या पुस्तकासारखे आहे. त्यांची दिनचर्या सर्वधर्मीयांसाठी खुली आहे. मुसलमानांसाठी फक्त पाच वेळा नमाज पढणे सक्तीचे आहे. प्रेषितांत या व्यतिरिक्त आयुष्यातील अनेक रात्री ऐच्छिक (नफील) नमाज पढत, कुरआन पठण करीत. धर्माचे शिक्षण देत. लोकांच्या असंख्य शंकांचे समाधान करीत. स्वच्छता राखण्याची पद्धत, जेवणाची पद्धत, वेषभूषा व केशभूषेची पद्धत शिकवीत. दैनंदिन जीवनातील अशी एकही क्रिया सांगता येणार नाही ज्यासंबंधी त्यांनी (स्व) मार्गदर्शन केले नाही. त्यांनी व्यापार केला, प्रवास केला, युद्धे केलीत, तह केले आणि आदर्श निर्माण केले. दारिद्र्य कसे जगावे याचा परिपाठ सादर केला. मुस्लिमांच्या फौजा अरबस्तानाबाहेर विजयावर विजय प्राप्त करीत होत्या त्या वेळी प्रेषितांच्या (स्व) अंतिम क्षणी आपल्या मातीच्या घरात दिव्यात घालण्यासाठी त्यांच्याकडे तेलही नव्हते! त्यांच्या हाती असलेल्या तलवारीची जगभर खूप चर्चा झाली; त्यांच्या उपासाची, फाक्यांची, अगदी साध्या राहणीची झाली नाही!

दलवाईंचे मुस्लीमविषयक आकलन

दलवाईंचे मुस्लिमांसंबंधीचे आकलन कर्मठ हिंदुत्ववाद्यासारखे आहे. 'राष्ट्रीय एकात्मता...' या दलवाईंच्या पुस्तकातील हिंदुत्वावरचे सातवे प्रकरण मुस्लीम वाचकांनी प्रथम वाचावे असा सल्ला आदरणीय भाई वैद्यांनी दिला आणि मी तो तंतोतंत मानला. वाचल्यानंतर माझ्या लक्षात जी बाब आली, जी दलवाईंवरील प्रेमामुळे भाईंच्या लक्षात आली नसावी. ती अशी की दलवाई ज्या मुद्द्यांवर हिंदुत्ववाद्यांना धारेवर धरतात तेच मुद्दे अन्यत्र मुसलमानांना ठोकण्यासाठी वापरतात.

इतिहास दलवाईंचा जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रेषितांच्या (स्व) अगोदर अज्ञानयुग (जिहालत) होते हे ते नाकारतात पण कोणते विज्ञानयुग होते हे सांगत नाहीत.[३६] इस्लामी राष्ट्रांमध्ये अल्पसंख्य जमाती नाहीत असे सांगून दक्षिण सुदान, लेबॅनॉन, इराकमध्ये 'अल्पसंख्य' दडपले जातात अशी तक्रारही करतात. भारतात दलित, पूर्वाश्रमीचे अस्पृश्य, आदिवासी आणि स्त्रिया दडपल्या गेल्या हे खरे नाही काय? दलवाईंची काही विधाने पाहाण्यासारखी आहेत – मुसलमानांच्या दृष्टीने इतिहासाचा आरंभ इस्लामपासून झाला आहे, इस्लामच्या इतिहासात अन्याय घडला असे मुसलमानांना वाटत नाही. मुसलमानांचे इतिहासाचे आकलन त्यांच्या वेडगळ समजुतीत आहे. ...यामुळेच हिंदूंना इतिहास नाही; संस्कृती नाही असे सुशिक्षित मुसलमानही मानत असतात.[३७]

दलवाई पाकिस्तानच्या दौऱ्यावर होते. तेथल्या मुसलमानांबद्दल ते वरील विधाने करीत असतील तर आक्षेप घेण्याचे कारण नाही. भारतीय मुसलमानांबद्दल बोलत असतील तर अशा मुसलमानांना भारतात राहाण्याचा अधिकार नाही. परंतु दलवाईंच्या धाडसाची मला कल्पना आहे. दलवाई म्हणतात तसे बोलणारा मुसलमान माझ्या आयुष्यात मी पाहिला नाही. इस्लामचा अभ्यास करणाऱ्या मुसलमानांना मुसलमानांनी किती अन्याय केला, अत्याचार केले हे दलवाईंपेक्षाही जास्त माहीत आहे. हिजाज बिन युसुफ, यजीद आणि उमय्यद घराण्याची राजवट अन्याय आणि अत्याचार करणाऱ्या राजवटी म्हणून कुख्यात आहेत. भारतातील इतिहास इसवी सनापूर्वीपासूनचा आहे. पाकिस्तानची संस्कृती मोहेंजोदरोची संस्कृती आहे. वेद आणि उपनिषदाचे संदर्भ मुस्लीम इतिहासकार मान्य करतात. एखाद्या बढाईखोर अशिक्षित श्रीमंत मुस्लीम माणसांची मते दलवाईंनी विनाकारण गंभीरपणे घेतलेली दिसतात किंवा मुसलमानांना बदनाम करण्यासाठी अशी ना शीर ना धड असलेली विधाने केलेली आहेत.

१७०७ साली औरंगजेबाचा मृत्यू झाला. मोगल साम्राज्याला लागलेल्या उतरत्या कळेचा वेग वाढला. दिल्लीवर मराठ्यांचा प्रभाव वाढला. १७३७मध्ये गुजरात आणि माळव्यावर त्यांनी प्रभुत्व मिळविले. पंजाबात शिखांचा, दिल्लीच्या दक्षिणेत जाटांचा उद्रेक झाला. छत्रपती आणि मोगल यांची अधिसत्ता मान्य करून पेशव्यांनी दोघांनाही न जुमानता आपले प्रस्थ बसविले. मोगल कमकुवत झाल्याने हिंदू जमीनदार समाजात डोईजड झाले. शेतकरी हवालदिल झाले, कारण 'मोगल जहागिरदार आणि मराठा सरदार यांच्या परस्परविरोधी अशा अवास्तव आर्थिक मागण्यांमुळे शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती वाढत गेली.'[३८] शेतकऱ्यांनी बंडे केलीत. ''आग्र्यानजीक झालेले जाटांचे बंड म्हणजे जमीनदारांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले शेतकऱ्यांचे उठाव हे जातीच्या उठावात मिसळल्यासारखे वाटतात... याखेरीज झालेल्या शेतकऱ्यांच्या बंडात जात, जमीनदार यापेक्षा धर्म, पंथ यांचा पगडा शेतकऱ्यांना संघटित करण्यात यशस्वी ठरला.[३९] दिल्ली व परिसरात मुस्लिमांचे जिणे दुष्कर झाले.

वरील चर्चा करण्याचे कारण दलवाईंनी शाह वलीउल्लाहचा केलेला उल्लेख. त्याच्या हिंदूविरोधी लेखनामुळे मुसलमान हिंदूंच्या विरोधात उभे राहिले. त्याने अहमदशाह अब्दालीस मराठ्यांचा बीमोड करण्यासाठी आमंत्रण दिले. वलिउल्ला १७०२मध्ये जन्मला आणि १७६२ साली वारला. १७३७ सालचे नादिरशाहचे आक्रमण, मुस्लिमांची कत्तल आणि दिल्लीकरांची ३०० वर्षांच्या बचतीची लूट त्याने पाहिली होती. कुणीही न बोलविता नादिरशहा आला होता. दिल्लीचे पतन नादिरशाहने जवळ आणले. मुस्लीम सत्तेचा ऱ्हास वलिउल्लाह पाहात होता आणि शेतकऱ्यांचा उठावांनाही जे धार्मिक द्वेषाचे गालबोट लागले होते; याचा त्याच्यावर परिणाम होणे साहजिक होते. मराठ्यांचा बादशाहीवरचा चौथाईचा हक्क, मोगलांची नामुष्की होती. जयचंद राठोडने जसे घोरीला बोलविले तसे वलिउल्लाने अब्दालीस बोलवून राष्ट्रद्रोह केला! सर्व काही सुरळीत सुरू होते आणि वलिउल्लाहने अब्दालीस बोलविले असे जे दलवाईंच्या लेखनातून व्यक्त होते तशी परिस्थिती नव्हती. वलिउल्लाह सूफी तत्त्वज्ञ होते हेही खरे आहे. विजया कुळकर्णीने अनुवाद करताना म्हटले, 'वलिउल्लाहने वहदत अलवजद आणि वहदत अशसुहद... यात उत्स्फूर्तपणे (तात्त्विक दृष्टीने नव्हे) मेळ घालून नवा सिद्धांत सिद्ध केला.'[४०] वास्तविकपणे वहदतुल वुजूद आणि वहदतुश्शुहूद असे दोन सिद्धांत आहेत.

मोपल्यांनी जे हत्याकांड घडविले याचा निषेध एकाही मुस्लीम नेत्याने केला नाही असा राग दलवाई व्यक्त करतात. **खिलाफत चळवळीचे नेते याकूब हुसेन यांनी मोपल्यांचा निषेध केला. मोपल्यांनी घडवून आणलेल्या धर्मांतरास त्यांनी कृष्णकृत्य संबोधून हिंदूंची सर्व मुसलमानांच्या वतीने माफी मागितली (जाड ठसा माझा).**[४१] गांधीजींनी तर हिंदूंसाठी हिंसेचा मार्गही मोकळा होता असे सांगितले.[४२] मोपल्यांच्या आगळिकीची शिक्षा त्यांना मिळाली याची नोंद दलवाईंनी घेतली असती तर त्यांना समाधान मिळाले असते. मोपल्यांचे बंड मोडण्यासाठी ब्रिटिशांनी हिंदुत्वनिष्ठ गुरखा व गढवाली सैन्याचा वापर केला. त्यांनी २३३७ मोपल्यांना कंठस्नान घातले. १६५२ जणांना जखमी केले.[४३]

काही साध्या मुस्लीम रीतिरिवाजांसंबंधी दलवाईंची निरागसता व्यक्त होते. ते युक्तिवाद करतात"' – तथापि मुस्लीम स्त्रीला बिगर मुसलमानाशी लग्न करण्याचा अधिकार देणारा बदल अजून मुस्लीम कायद्यात केलेला नाही. कारण त्यामुळे धर्मकायद्यात घातलेल्या मर्यादेचे उल्लंघन होते. स्पेशल मॅरेज अॅक्टमुळे असे विवाह कायदेशीर झाले आहेत. परंतु कोणत्या धर्माच्या शास्त्रांनी अशा विवाहांना मान्यता दिलेली आहे हे ते सांगत नाहीत. अशा कायद्यांनी राष्ट्रीय एकात्मतेस हातभार लागेल असे त्यांना वाटते.

त्याचप्रमाणे धर्म खासगी बाब मानल्याने भारतीयांमधील संघर्ष टाळता येतील असा युक्तिवाद दलवाईच नव्हे तर अनेक विचारवंत करीत असतात. मला वाटते की धर्म खासगी बाब राहूच शकत नाही. आतापर्यंतचा इतिहास दर्शवितो की, धर्म समूह निर्माण करतो. त्यात माणसे जोडताना समाजातील इतर समूहांमध्ये जी माणसे जाऊ शकली असती त्यापासून तेवढी माणसे आपण तोडतो. या समूहांची आराधना पद्धती सामूहिक असते. जगातील सर्व धर्मांची प्रार्थनास्थळे धर्म खासगी असू शकत नाही याची साक्ष देतात. शासनाने निखळ भौतिकवादी होऊन सगळ्या धर्मांची प्रार्थनास्थळे आणि धर्माच्या सर्व धार्मिक कार्यक्रमांवर बंदी आणली तर धर्म खासगी बाब होण्याची शक्यता निर्माण होईल. दलवाईंनी राष्ट्रीय मुस्लीम नेत्यांच्या मुलाखती घेऊन ते जातीयवादी असल्याचा निष्कर्ष काढला. भारतीय मुसलमान समाजाला शत्रू मानतो असा दलवाई आरोप करतात. भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेट मॅचमध्ये मुसलमान पाकिस्तानच्या बाजूने चीअरअप करतात. याखेरीज दलवाईंच्या प्रतिपादनातील बारा मुद्द्यांचा परामर्श वसंत पळशीकरांनी एका लेखात केला आहे. या प्रतिपादनास पळशीकरांनी 'प्रबंध' असा गलेलठ्ठ शब्द वापरला आहे. मुसलमानांचे राष्ट्रीय नेते पाकिस्तानशी निष्ठा राखून होते, इथल्या हिंदूंशी मुसलमानांनी सहकार्य करू नये असा त्यांचा आटापिटा होता. त्यांना समान नागरी कायदा नको होता. काश्मीर पाकिस्तानला द्या असा ते आग्रह करीत. घुसखोरांना ते घुसखोर मानीत नव्हते. हिंदूंना अगदी नेहरूंनासुद्धा ते काफिर म्हणत. भारत इस्लामी राज व्हावे असे स्वप्न ते पाहात. लोकसभेला मुसलमानांसंबंधी कायदे करण्याचा अधिकार नाही असे त्यांना वाटते. कुटुंबनियोजन झुगारून आपली लोकसंख्या वाढवा असा सल्ला ते देतात. प्रेषितांबर आणि कुरआनवर कुणी टीका करू नये अशी अरेरावी करतात.

मुलाखतीत दलवाईंनी जमविलेली माहिती कुणाही भारतीयासाठी अतिशय धक्कादायक व अक्षम्य आहे. या संदर्भात दलवाईंनी मूलभूत चूक केली असे मला ठामपणे वाटते. अशा मुसलमानांना त्यांनी उघडे पाडून त्यांच्या विरोधात चळवळ उभी केली असती तर ते सर्वाधिक महत्त्वाचे ठरले असते. तलाकपीडित महिलांची समस्या जरूर आहे, परंतु प्रस्तुत समस्येत राष्ट्रद्रोह आहे.

वसंत पळशीकर दलवाईंना उद्धृत करतात '...बाह्यत: सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या प्रगत मुसलमानदेखील मुस्लीम वेगळेपणाची (separatist) कास धरताना दिसतो. कारण समाज हाच एक शत्रू आहे, ही कल्पना सुशिक्षित प्रगत मुसलमानांनी सोडलेली नाही.' (दलवाईंनी हा लेख १९७२-७३ साली लिहिलेला आहे, त्यांच्या मुस्लीम जातीयतेवरील पुस्तिकेच्या नंतरचा आहे, हे ध्यानी घ्यावे)" जगभरातील लोकसमूहांमध्ये – विशेषकरून अल्पसंख्य समूहांमध्ये आणि भारतात तर सर्व जातीय समूहांनी 'वेगळेपणाची कास' धरली आहे. दलवाई मुस्लीम देशांमधील अल्पसंख्याकांची बाजू घेऊन बोलतात (आणि अगदी बरोबर बोलतात!) त्या वेळी ते त्यांच्या वेगळेपणाविषयीच बोलतात हे दलवाईंच्यादेखील लक्षात नसते. 'वेगळेपणा' या शब्दास 'सेपरॅटिस्ट' हा इंग्रजी शब्द त्यांनी दिला. त्यांना 'देशातून फुटून निघू पाहाणारे' हा अर्थच अभिप्रेत आहे. आता 'सुशिक्षित आणि प्रगत' मुसलमानच फुटून निघतात तर मुसलमानांना सुशिक्षित आणि प्रगत कशासाठी करावे? दलवाई, त्यांचे मुस्लीम मित्र आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सदस्य आणि कार्यकर्ते सोडून उरलेल्या फुटीर मुसलमानांची विल्हेवाट कशी लावावी याची उपाययोजना दलवाई सांगत नाहीत, हा त्यांच्या तत्त्वज्ञानामधील मोठा दोष आहे. आर.एस.एस. ही संघटना या कारणाने मला फारच उदार वाटते की, तिच्याजवळ याचा उपाय आहे! एका फटक्यात मुसलमानांना हिंदू केले की, ना रहेगा बास ना बजेगी बासुरी!!

अस्मिता जपणे दलवाईंना वेगळेपणा वाटत असेल तर भारतात अस्मिता जपणाऱ्यांची झुंबड उडाली आहे. मुसलमानांना समाज शत्रू वाटतो. समाजाला दलवाईंप्रमाणे जर माहीत असेल मुस्लीम आपल्याला शत्रू मानतात तर समाज मुसलमानांना मित्र मानील काय? दलवाईंच्या लेखनातून, बोलण्यातून काय अर्थ निघतात हे गोरे, ग. प्र., पु. ल., भाई वैद्य यांनी दलवाईंना समजावयास हवे होते! यात मी कुरुंदकरांचे आणि शहांचे नाव घेतले नाही. नाही तर मी ज्यांची नावे घेतली ते दलवाईंशी सहमत असतील तर सर्वसामान्य बहुसंख्य मुसलमानांची ही विटंबना आहे आणि ती दलवाईंची व्यक्तिगत मते होती असे त्यांचे म्हणणे असेल तर ही दलवाईंशी प्रतारणा आहे!

भारत-पाकिस्तान क्रिकेट मॅचच्या वेळी पाकिस्तानच्या बाजूने घोषणा देणाऱ्यांविरुद्ध देशद्रोहाचा खटला भरा. मुसलमानांना जर समाज शत्रू वाटतो तर त्यांच्याशी असंख्य व्यवहार आज चालले नसते. अनेकदा गैरसमज असतात, गैरसमजाची जागा कधी तरी संशयाने घेतलेली असते. पण एकमेकांबद्दल विश्वासही असतो. प्रबोधन करणाऱ्याने तो वाढवावयाचा असतो. दलवाई या विश्वासाचे मूळच उखडून टाकायला निघाले आहेत असे वाटते. फुटून निघायच्या वेळी आणि नंतर काय होत असते याचे चित्र आणि वेदना केवळ मुस्लिमांनाच नव्हे सर्व सीमावर्तीयांना माहीत आहे.

दलवाई व सर सैय्यद

सर सैय्यद अहमदखान (१८१७-१८९८) यांना दलवाईंनी घमेंडखोर म्हटले आहे. मला ते लाचार वाटतात. व्यावहारिक फायद्यासाठी वाकलेला मजबूर इन्सान वाटतात. पण त्यांना व्यवहार कळत होता. हल्ली जशी एक व्यक्ती-एक मत अशी निवडणुकीची पद्धत आहे तशी सर सैय्यद यांच्या वेळी अस्तित्वात होती असा दलवाईंचा गैरसमज झाला असावा. मतदारासाठी शिक्षण आणि त्याची कर भरण्याची क्षमता अशा अटी असत. या अटी पूर्ण कराव्या लागत. साहजिकच मुस्लीम मतदारांची संख्या मर्यादित झाल्याने मुस्लीमप्रतिनिधित्व कमी असेल अशी भीती त्यांना वाटली. ती अस्थानी नव्हती. हिंदीला शासकीय भाषेचा दर्जा मिळणे, उर्दूची उचलबांगडी होणे, गोहत्येवरून व मशिदींवरून वाद्ये वाजवत मिरवणुका नेणे यावरून दंगली होणे, मध्ययुगीन मुस्लीम राजवटीत हिंदूवर झालेल्या अन्यायाची हिंदूंना जाण होणे या कारणांमुळे सामाजिक अस्वस्थता निर्माण झाली. सर सैय्यद यांनी नोकरी मिळण्यात 'खान दान' या घटकाला महत्त्व दिले पाहिजे अशी विचित्र मागणी केली. ही देखील लाचारीच!

सर सैय्यद यांच्या समाजसुधारणांविषयी लिहिण्याची ही वेळ नाही. इंग्रजी सत्ता गेल्याने काय होईल याचे दुःस्वप्न त्यांना पडत असे. हिंदूंची संघटना म्हणून त्यांनी काँग्रेसवर टीका केली असली तरी मुसलमानांनी तिच्यात सामील होऊ नये व इंग्रजविरोध प्रबळ होऊ नये हीच खबरदारी त्यांना घ्यावयाची होती. १६ फेब्रुवारी १८७४मध्ये बॉम्बे गॅझेटमध्ये ब्रिटिशांनी हिंदूंना अनुकूलता दर्शविली होती. सैय्यद यांच्या लेखी ही महत्त्वाची घटना होती. मुसलमानांविषयी १८५७पासून इंग्रजांचे कलुषित झालेले मन अजून स्वच्छ झाले नव्हते. मुसलमान वैफल्यग्रस्त झाले होते. सर्वसामान्य मुसलमानांना ब्रिटिशांविषयी आपुलकी वाटण्याचे काहीच कारण नव्हते. सर सैय्यदांनी मुस्लीम-ख्रिश्चन सहभोजने आयोजित केली.

भारतीय राष्ट्रवादाच्या प्रक्रियेत व प्रवाहात हिंदू सुशिक्षित वर्ग आला तसा मुस्लीम सुशिक्षित वर्ग आलाच नाही अशी दलवाईंची तक्रार आहे. कालानुक्रमाने पाहाता सुशिक्षितांऐवजी फकीर आणि संन्यासी यांनी राष्ट्रवादाची मुहूर्तमेढ रोवली. वसंत पळशीकर म्हणतात, 'दलवाईंचा हा अभिप्राय सर सैय्यद अहमद यांच्या प्रभावाच्या व मुस्लीम लीगच्या आरंभीच्या कालखंडाबाबत खरा आहे; पण अलीगढमधून शिकून बाहेर पडलेल्या विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातील पदवीधारकांमध्ये राष्ट्रवादाची प्रेरणा निर्माण झाली. इतर शिक्षित मुसलमानांमध्ये तर राष्ट्रवादाचा प्रभाव कदाचित आधीपासून आढळेल. जिना हे एक अत्यंत ठळक उदाहरण आहे.'[४६] जमाएतुल उलेमांना सुशिक्षित मानता आले तर या संघटनेचा काँग्रेसला पाठिंबा होता असे दिसून येईल. बारकाईने पाहिले तर भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप धार्मिक रंगांनी फिकटपणाने का होईना रंगविलेले होते. लाल, बाल आणि पालांचा हिंदू राष्ट्रवाद होता. कर्मठ मुस्लीम असणाऱ्या अलीबंधूंचा मुस्लीम राष्ट्रवाद होता. १९०९मध्ये भाई परमानंदांनी व १९२४मध्ये लाला लजपतराय यांचा हिंदुत्ववाद फाळणीच्या उंबरठ्यावर होता. या सर्व बाबी सबुरीने दलवाईंनी लक्षात घेतल्या नाहीत.

भारताचे विभाजन

भारताच्या फाळणीविषयीचे मौलिक स्रोत दुर्दैवाने दलवाईंच्या निधनानंतर उपलब्ध झाले. हे स्रोत अभ्यासून त्यावर संशोधन करून मूलभूत लेखनही झाले. व्यक्तिगत राजकीय विचारप्रणालीमुळे या विश्लेषणाला मर्यादाही पडल्या असतील. याच काळात उपलब्ध असलेल्या लेखनावर आधारित लेखन दलवाईंनी केले आहे. स्वातंत्र्य प्रदान करण्याची ब्रिटिश शासनाने आखलेली योजना म्हणजे राजकीय सुधारणांचे हप्ते होत. हे हप्ते अखंड भारताला पोखरून काढीत आहेत हे सत्य आपले वाटे ओरबाडून घेणाऱ्या जातिधर्मांच्या लोकांना कळणे कठीण होते. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे डावपेच हिंदू-मुसलमानांतील संघर्ष वाढविण्याचे होते. अनिता इंदरसिंग यांना उद्धृत करून प्रा. फक्रुद्दीन बेण्णूर म्हणतात, 'इंग्लंडने आयर्लंड, पॅलेस्टाईन, सायप्रस आणि हिंदुस्थान या चार देशांत भिन्नधर्मीय जमाती एकत्रित राहू शकत नाहीत हा मुद्दा निर्माण करून त्या देशांच्या फाळण्या घडविल्या.'[४७] काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे असे दुराग्रहाने मुसलमानांकडून सांगत ठेवायचे आणि मुस्लिमांचे म्हणणे काय आहे हे ब्रिटिशांना ऐकून घ्यावे लागेल असा मानभावीपणा करत राहण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते.

मुस्लिमांचे मन मुळातच विस्तारवादी असते, असा लीगी मुस्लीम नेत्यांना डोळ्यांसमोर ठेवून दलवाईंनी काढलेला निष्कर्ष मुस्लीम मनाचा शोध घेणाऱ्या काही हिंदुत्ववादी मनकवड्यांच्या पंक्तीत त्यांना नेऊन बसवितो. बिश्वमोहन पांडे यांनी भारताच्या फाळणीसंबंधी म्हटले आहे - 'मून (पेंडेरल) यांच्या युक्तिवादाचा आधार १९४६ सालच्या निवडणुका हा होता. मुस्लीम बहुसंख्याक प्रांतांमधील मतदारसंघात लीगला ७५% मते मिळाली. म्हणून मून म्हणतो की, मुसलमानांचा लीगला आणि तिच्या पाकिस्तानच्या मुख्य मागणीला पूर्ण पाठिंबा होता. उपखंडातील १९४१च्या शिरगणतीने उपखंडातील मुस्लीम लोकसंख्या ७९ दशलक्ष होती. लीगने मिळविलेल्या मुस्लीम जागांना मिळालेली मते मात्र केवळ ६ दशलक्ष होती. याचा अर्थ असा की, मुस्लीम लोकसंख्येपैकी फक्त ७.६% मुस्लिमांनी मतदान केले. ७९ दशलश लोकसंख्येपैकी ५०% प्रौढ आहेत म्हणजे ३९.५ दशलक्ष एवढे! याचा अर्थ मतदानाची शेकडेवारी केवळ १६% आहे. पाकिस्तान मागणीस फक्त १६% मुसलमानांचा पाठिंबा होता.'[४८]

दलवाई गांधीजींना आदर्श मानतात ही बाब आश्चर्याची असली तरी चांगली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे

गांधीजी आध्यात्मिक होते. आस्तिक होते. खलिफा उमर यांना ते आदर्श मानीत. इस्लामचा आणि इतर धर्मांचा आदर करीत. दलवाईंवरील लेखात पळशीकरांनी गांधीजींच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. 'ब्रिटिशांनी आखून दिलेल्या चौकटीतले सत्तेचे राजकारण वर्ज्य करावे, घटनात्मक सुधारणांच्या वाटाघाटींच्या खोड्यात सापडू नये, सत्य, न्याय, शोषणमुक्ती अशा गोष्टींच्या प्रस्थापनेसाठी ज्यात हिंदू-मुस्लीम ऐक्य व अस्पृश्यतानिर्मूलन, जातपातनिर्मूलन यांना निर्णायक स्थान होते. रचना व संघर्ष यांची सांगड घालावी हा मार्ग गांधीजींनी दाखवून दिला होता.''[४९] काँग्रेसने सत्ताकारण केले व तिचे संक्षेपण हिंदू संघटन झाल्याबद्दल पळशीकर खेद प्रकट करतात. मुस्लीम लीग ही जातीयवादी संघटना असल्याने तिच्या अवास्तव मागण्या मान्य करणार नाही अशी भूमिका काँग्रेसने घ्यावयास हवी होती. परंतु असे घडणे सर्वतोपरी अशक्य होते.

हिंदू जातीयवाद – मुस्लीम जातीयवाद

मुस्लीम जातीयवाद हे हिंदू जातीयवादाचे मूलभूत कारण आहे अशी मांडणी दलवाई करतात. मुस्लीम असतानाही न्यायोचित मुस्लीम विरोध करणारा अशी स्वतःची प्रतिमा त्यांना निर्माण करायची होती. परिणामाविषयी ते बेफिकीर असत. हिंदूंना काफिर म्हणणे अयोग्य आहे. त्याचा निषेध व्हावयास हवा. मुसलमानांना लांड्या, म्लेंच्छ आणि यवन म्हणणाऱ्यांचा दलवाईंनी किंवा त्यांच्या मित्रमंडळींनी कधी निषेध केला आहे का? स्वामी दयानंद सरस्वती हिंदुतेरांना 'दस्यू' अर्थात 'दुष्ट' म्हणत असत. या हमरीतुमरीवर पळशीकरांनी चांगला उपाय सुचविला. ते म्हणतात, 'हिंदू-मुस्लीम गैरसमज ना संघाने निर्माण केले ना काँग्रेसने ना लीगने, या संस्था निर्माण होण्याच्या अगोदरपासून परस्परांच्या व्यवहारांमध्ये कुणाचे काय चुकते, हे शोधले पाहिजे.''[५०] याला थोडी पुष्टी देऊन मी म्हणतो की, एक माणूस म्हणून हा विचार केला पाहिजे. धार्मिक अहंकार बाजूस ठेवून मी केवळ मुस्लीम आहे. म्हणून माझे व्यवहार, माझी वागणूक, माझी बाजू नेहमीच खरी असा दुराग्रह करता कामा नये. माझ्या पत्नीशी माझी वागणूक कशी आहे, मला जे हक्क आहेत ते तिला मी देतो का, माझे तिच्याशी पटत नाही असे असेल तर नेमके कुणाचे चुकते, माझेही चुकत असेल, मी मुस्लीम आहे तो त्रिवार तीन तलाक देण्यासाठी नाही की चार बायका करण्यासाठीही नाही. मी सभ्यता पाळतो की नाही, मी माझ्या शेजाऱ्यांशी चांगला वागतो की नाही, माझ्याकडून समाज जातीयवादापासून लांब राहाण्याची अपेक्षा करतो ती पूर्ण केली पाहिजे. समाज माझा आहे. देश माझा आहे. देशाचे ऋण फेडायचे आहे. वाईटाची परतफेड मी चांगल्याने करीन. यात कुणाचे विस्तारवादी मन येणार नाही, माझा धर्म श्रेष्ठ की तुझा हे येणार नाही. तटस्थपणे आपल्यासारख्या 'सर्वसामान्य' माणसाच्या दिनक्रमात डोकावून बघा, मनःशांती बिघडणार नाही.

दलवाई त्यांच्या होलसेल प्रतिपादनात मुस्लिमास अतिकर्मठ बनवितात. पळशीकरांनी एक मोठे सत्य सांगितले आहे, ते म्हणजे – मुसलमानांचे जीवन ९०-९५ टक्के शरीयतच्या कायद्यानुसार चालत नाही.''[५१] मुस्लिमांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. मुली शिकावयास लागल्या आहेत. अशिक्षित मुस्लीम आनंदाने आणि उत्साहाने त्यांना शिकवीत आहेत. शास्त्रांमधील सिद्धांत, डार्विनचा सिद्धांत, न्यूटनचा सिद्धांत आमच्या इस्लाममध्ये नाहीत म्हणून ते शिक्षण बंद करा असा मोर्चा मुस्लीम पालकांनी, मुल्लामौलवींनी आणलेला नाही.

राखी चक्रवर्ती यांनी इरफान हबीब यांची मुलाखत घेतली. तिचे शीर्षक आहे – 'मॉडर्न सायन्स कॅन बी परस्यूड बाय एनी बिलिव्हर'

चक्रवर्ती – इस्लाम आणि आधुनिक विज्ञान यात संघर्ष आहे का?

इरफान हबीब – मला नाही वाटत. आधुनिक विज्ञानाचा अभ्यास कोणताही धार्मिक माणूस करू शकतो. याचं एक उदाहरण देतो. पदार्थविज्ञानशास्त्राचा पाकिस्तानी नोबेलधारक अब्दुस्सलाम आयुष्यभर श्रद्धावान होता. तो पाच वेळा नमाज पढत असे आणि विज्ञानाचे संशोधन करीत असे. इस्लाम आणि आधुनिक विज्ञान यात त्यांना काहीच संघर्ष दिसला नाही. जे इस्लामचे अनुयायी विज्ञानाविषयी बोलतात त्यांना वाटते की, आधुनिक विज्ञान पाश्चिमात्य आहे आणि ख्रिश्चन नैतिकतेने प्रभावित झाले आहे ते मला शंकास्पद वाटते. विज्ञान इस्लामांतर्गतच आहे. ८वे ते १२वे शतक हा कालावधी इस्लाममधील विज्ञानाचा सुवर्णकाळ आहे. बगदादमध्ये अब्बासिद खलिफाने 'बैतुल हिकमाह' (House of Wisdom) निर्माण करून बुद्धिप्रामाण्यतेचा आणि नैसर्गिकशास्त्रांचा पाया घातला. सगळ्या धर्मांच्या आणि पंथांच्या विद्वानांना तेथे द्वारे खुली होती. ग्रीकांच्या पैतृकतेने आधुनिक जगाचा बुद्धिप्रामाण्यतेचा प्रकाश अरब तत्त्ववेत्त्यांच्या माध्यमातून पाहिला. आधुनिक वैज्ञानिक संशोधनाचा गुरू अरब होता. परंतु इरफान हबीब यांनी मान्य केले की, इस्लामी जगत आणि आधुनिकता व विज्ञान यामधील दरी वाढत चालली आहे. अरब राष्ट्रे विज्ञानापेक्षा तांत्रिक ज्ञानाचा लाभ घेत आहेत कारण विज्ञान तंत्रज्ञान घेऊन येते. तंत्रज्ञानाचे तसे नाही. ट्युनिशियात मात्र विज्ञान आणि पारंपरिकता यात संमिश्रता आली असून खूप खुलेपणा आलेला आहे.''[५२]

इस्लाम धर्मात सुधारणा करण्याची घाई आणि उत्साह दलवाईंना चमत्कारिक पातळीवर आणतो. 'सांप्रदायिकता विरोध : आणखी काही विचार'[५३] या लेखात – 'पैगंबरानंतर पैगंबर नाही.' या सिद्धांताला फायनॅलिटीचे स्वरूप आले आहे आणि ही फायनॅलिटी ज्ञान, विज्ञान, शास्त्र, सामाजिक अवस्था या साऱ्यांना लावण्यात आली आहे. परिणामी हिंदूंशी कसे

वागावे हेदेखील फायनॅलिटीच्या सिद्धांतावरून ठरले गेले आहे असे ते म्हणतात."[४] हे अत्यंत निरर्थक वाक्य आहे. एक तर पैगंबरानंतर पैगंबर नाही ही श्रद्धा आहे, कुठलाही सिद्धांत नाही. हिंदूंमधील अवतारांचा जितका परिणाम त्यांच्या मुसलमानांशी असणाऱ्या वागणुकीवर पडतो तेवढाही फायनॅलिटीच्या 'सिद्धांताचा' पडत नसेल. अहमदिया पंथाचे संस्थापक अहमद कादियानी यांनी ही श्रद्धा नाकारली. बरेच साम्य असून थोड्या फार श्रद्धा बदलल्याने अद्वैत मानणाऱ्यांमध्ये किती संप्रदाय निर्माण झाले, हे सर्वश्रुत आहे. इस्लामपेक्षा हिंदू धर्म लवचीक असल्याने हिंदू धर्मात अशा बाबी शांतीने स्वीकारण्यात आल्या. अर्थात काही वेळा शैव आणि वैष्णव यांच्यात बखेडेही झाले.

हिंदू मजहब भी किताबी मजहब है

हिंदू मजहब किताबी मजहब नहीं है, हा विचार सर्वसाधारण मुसलमान सोडायला तयार नाही असे दलवाई ठणकावून सांगतात. (तशी प्रत्येक गोष्टच ठणकावून सांगतात!) वाचकांनीच याचा अनुभव घ्यावा अशी माझी नम्र विनंती आहे. तुम्हाला वाटणाऱ्या सर्वसामान्य मुसलमानास 'किताबी मजहब' काय आहे हा प्रश्न विचारा. त्याला या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. ज्या धर्माच्या प्रेषितांना ईश्वराने 'धर्मग्रंथ' दिला, त्या धर्माला 'किताबी मजहब' असे म्हणतात. मुसांना (मोझेस) म्हणजे ज्यूंना तौरात, येशूंना (ख्रिश्चनांना) इंजिल आणि दाऊद*-डेव्हिड यांना जबूर ग्रंथ मिळाले. अनेक प्रेषितांना 'सईफे' कागदावर (भूर्ज, चर्म) आज्ञा, नियम देण्यात आले. हिंदूंमधील श्रीकृष्ण, श्रीराम यांना प्रेषित मानता येईल. हिंदू तर वेद, उपनिषदे आणि भगवद्गीतेस मानतात. मालेगावसारख्या शहरात डॉ. साजिद सिद्दिकी यांनी **'भगवद्गीता' खुदा का बयान** हे पुस्तक लिहून त्याचा शानदार प्रकाशन सोहळा केला. युनिटी प्रिंटर्स, मालेगावने हे पुस्तक छापले आहे. प्रकाशन सोहळ्यात मुस्लीम धर्मपंडितांनी आणि संस्कृत पंडितांनी भाग घेतला. हे पुस्तक पांडित्यपूर्ण आहे असे नाही, परंतु एका मुस्लिमाने ते लिहावे व मालेगावमधील व बाहेरील हिंदू, मुस्लीम धर्मपंडितांनी त्याचे कौतुक करावे हे महाराष्ट्रास भूषणावह आहे. या सर्वांना सलाम!

दलवाई आणि मुस्लीम लोकसंख्या

मुसलमानांची संख्या वेगाने वाढत असून भारतात मुस्लीमराज येण्याची भीती संघवाल्यांपेक्षाही जास्त दलवाईंना होती. १९६१-१९७१ आणि १९७१ ते १९८१ या दोन दशकांमधील हिंदू आणि मुसलमानांमधील लोकसंख्यावाढीची तुलना केली तर असे दिसेल की, हिंदूंची लोकसंख्यावाढ २३.७१%वरून २४.४२% झाली. मुस्लिमांची शेकडेवारी थोडी कमी झाली (३०.८१% वरून ३०.२०% वर आली) १९८१नंतर हे प्रमाण गोठविले तर २०८१मध्ये हिंदूंच्या वाढीची टक्केवारी ३०.७१ तर मुसलमानांची ३०.५५ असेल!"[६] कुटुंब नियोजनाविषयी भारतीय मुस्लिमांची आकडेवारी कमी आहे पण निराशाजनक नाही. कुटुंबनियोजनाची साधने वापरणाऱ्या मुस्लिमांची संख्या १९७० मध्ये ९% तर हिंदूंमध्ये १४% होती; १९८०मध्ये ती अनुक्रमे २२.५% आणि ३६.१% होती.[६] इजिप्तमधील मुस्लीम पंडित ए. आर. ओमरान म्हणतात, 'कुरआनमध्ये गर्भधारणा प्रतिबंधक साधने वर्ज्य करण्यासंबंधी माहिती नाही.'[७]

जिनांचा हटवाद

जिनांच्या राजकारणाची चिकित्सा दलवाई करतात."[८] जिनांवर खूप साहित्य उपलब्ध आहे. जिनांच्या फुटीरवादी राजकारणाचा भाग फाळणीचा अभ्यास करताना लक्षात घ्यावाच लागतो. ब्रिटिशांशी सहकार्य करणारे मुस्लीम जातीयवादाचा आसरा घेत जास्तीत जास्त राजकीय सवलती मिळणारे 'खलपुरुष' म्हणून ते सर्वपरिचित आहेत. दलवाई म्हणतात, 'हिंदूंशी हातमिळवणी करून ब्रिटिशांविरुद्ध लढायला जिना नेहमी उत्सुक होते असे जिनांचे समर्थक नेहमीच सांगतात. अडचण फक्त गांधी-नेहरू तडजोड न करण्याची होती.'[९] दलवाईंसारखा धाडसी माणूस जिनांचे भारतातले समर्थक कोण, हे का सांगत नाहीत? जिनांना येशूच्या पातळीवर बसवून ठेवण्याचे प्रयत्न भारतातील भोंदू उदारमतवादी करताना दिसतात.[१०] इथेही नावे सांगायला अडचण दिसते. आधुनिकतेचे आणि पाश्चात्त्य संस्कृतीचे प्रहार होत असलेला हा समाज केवळ बाह्यतःच वेषभूषेच्या संदर्भात बदललेला आहे. अंतर्यामी तो इस्लामच्या जिहादच्या प्रेरणेने भारावलेला आहे.[११] हे विधान बेजबाबदार नाही हे माझ्या समाजवादी मित्रांनी मला समजून सांगावे! हे त्यांचे विधान 'सर्वसामान्य' विधान आहे. त्याला त्यांनी कुणाला अपवाद केलेला नाही. 'सर्व मुस्लीम तरुण (म्हाताऱ्या मुस्लिमांकडून दलवाईंना धन्यवाद!) 'जिहादी' आहेत असा या वाक्याचा अर्थ आहे. माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंतच्या कुणाही सरसंघचालकाने असे विधान केलेले नाही! दलवाईंचे हे विधान मुस्लीम तरुणाच्या दारिद्र्याची, मागासलेपणाची, उपाशी पोटाची, बेकारीची क्रूर थट्टा करणारे आहे.

गांधीजींनी राजकीय सुधारणांमागचा जो ओळखलेला धोका होता त्याची पळशीकरांनी केलेली चर्चा आपण पाहिली. सुधारणांमध्ये आपल्याला अधिक वाटा मिळावा म्हणून सर्व अस्तन्या वर करून टपलेले होते. लखनौ करारावर खूप टीका होते. त्यात प्रतिनिधित्वाचे वाटे कसे होते? पंजाबमध्ये मुस्लीम लोकसंख्या ५४% आणि प्रतिनिधित्व ५०%, बंगालमध्ये मुस्लीम लोकसंख्या ५२.३% आणि प्रतिनिधित्व ४०%; ज्या प्रांतांमध्ये हिंदू बहुसंख्य होते तेथे अल्पसंख्य मुस्लिमांना 'भार' मिळाला. पण तो ५०% नव्हता. पाकिस्तानच्या निर्मितीच्या बाबतीत जिनांवर कडक टीका व्हायलाच हवी! पण लखनौ कराराच्या संदर्भात नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा एकभार योजना सुचविली होती. दलितांच्या आधाराशिवाय ना काँग्रेस स्थिर सरकार देऊ शकली असती ना लीग. ही बाब दलवाईंच्या चाणाक्ष

नजरेतून सुटलेली दिसते. गांधीजींच्या नेतृत्वावर चर्चा होते तशी जिनांच्या नेतृत्वावर का होऊ नये हा गमतीदार प्रश्न ते विचारतात. दलवाईंनी जिनांची नोंद घेण्यापूर्वी जिनांवर साहित्य उपलब्ध होते. चर्चा करायला कोणी कुणाची परवानगी घेत नाही. इस्लामवर टीका करण्यापूर्वी त्यांनी कुणाची परवानगी घेतली होती? नेहरूअहवालावर हिंदू महासभेच्या प्रतिक्रियेवर त्यांना चर्चा करावीशी वाटली नाही. या अहवालाने हिंदूमहासभेचे तत्कालीन अध्यक्ष बॅ. जयकर खूश झाले. 'आजवर काँग्रेसकडून सुचविण्यात आलेल्या कोणत्याही योजनेपेक्षा हा अहवाल हिंदूंना अधिक फायदेशीर आहे', असे त्यांचे निरीक्षण आहे.[८२]

या अहवालात काही किरकोळ दुरुस्त्या जिनांनी सुचविल्या. त्यांना न शोभणारी नम्रता स्वीकारून त्यांनी हिंदूमहासभेला, काँग्रेसला भावनात्मक विनंती केली पण हिंदूमहासभेने दाद दिली नाही. डॉ. सदानंद मोरे म्हणतात, 'मुसलमानांच्या मागण्यांची कोणी दखल घेईना वा त्यांना दादही देईना... जिना तेव्हापासून ऐक्यवर्धनाच्या ध्येयापासून दुरावत जाऊ लागले आणि खरे तर ऐक्याची शक्यता तेव्हा संपली.'[८३]

मुस्लीम अहिंसकही असतात

मानवी मूल्यांची चाड सर्वाधिक ख्रिश्चनांमध्ये आहे. 'हिंदू अजूनही या बाबतीत हिंदू ख्रिश्चनांची बरोबरी करू शकले नसले तरी मानवी मूल्यांसाठी हौतात्म्य पत्करणारे गांधी हे हिंदू समाजाने मानवी मूल्यांच्या आदरासाठी चालविलेल्या धडपडीची प्रतीके आहेत. अशी धडपडच इस्लामी जगतात कुठे दिसत नाही.'[८४] दलवाईंचे गांधीजींसंबंधीचे आकलन तोकडे असल्याच्या खुणा त्यांच्या लेखनात एकमेकींत मिसळून गेल्या आहेत. गांधीजी स्वतःला केवळ हिंदू नाही तर अतिहिंदू म्हणवीत म्हणून ते सर्व भारतीय समाजाचे प्रतिनिधी आणि प्रवक्ते बनतात. अतिहिंदू म्हणजे हिंदूंच्या पल्याडचा हिंदू! हिंदू महासभेवाले असे पल्याडचा हिंदूवाले नव्हते. त्यांना मारणारा काय म्हणवून घेत होता? त्याचे कौतुक करणारे काय म्हणवून घेत होते व म्हणवून घेतात? दलवाईंच्या विधानाने अनर्थ करणारे अर्थ ध्वनित होतात. मानवी मूल्यांची बूज राखणारे मुस्लीम गांधीजींच्या छायेत तयार झाले. हिंसा सोडून अहिंसक झालेले लाल डगलेवाले पठाण, सरहद्द गांधी, मौलाना आजाद, झाकीर हुसेन इत्यादी मला वाटते मुसलमानच होते. भारताच्या फाळणीला विरोध करणाऱ्या मोमिन कॉन्फरन्समधील काही कोटी सदस्य-मुसलमानच होते.

समान नागरी कायदा

समान नागरी कायद्याची गरज घटना निर्मितीच्या वेळीही अनेक घटना समितीच्या सदस्यांना जाणवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर म्हटले होते की, या कायद्याशिवाय भारतीय राज्यघटना अपूर्ण आहे. या संदर्भात काही गोष्टींची दखल घ्यावयास हवी - (१) त्या काळात शासनाने कोणत्याही धर्मसमूहाचा व्यक्तिगत कायदा करणे म्हणजे हस्तक्षेपच होता.

(२) हिंदू, शीख, जैन, बौद्ध यांच्यासाठी एकत्रित हिंदू कोड बिलासंबंधी हिंदूंच्या मनामध्ये शंका होत्या.

(३) हिंदू कोड बिल पास होताना संसदेसमोर काही निदर्शने झालीत.

(४) पाकिस्ताननिर्मितीनंतर जे मुसलमान भारतात राहिले त्यांच्या मनात अपराधीपणाची भावना होती. खजिल झालेल्या मुस्लिमांची कदर करण्यासाठी हा धार्मिक मामला मार्गदर्शक तत्त्वांमध्ये टाकण्यात आला.

(५) घटना समितीत मुस्लिमांना अगोदर ठरलेले आरक्षण नाकारताना सरदार पटेलांनी जशी आक्रमक भूमिका घेतली होती तशी समान नागरी कायद्याच्या बाबतीत घेतली असती तर प्रश्न चिघळला नसता किंवा आरक्षण देऊन या विरोधास बोथट करता आले असते.

हिंदूकोड बिल पारित करताना कोणत्या शंकराचार्यांचा सल्ला घेतला होता असा प्रश्न दलवाईंनी विचारला आहे. शंकराचार्यांचा नाही पण दुसऱ्या एका धर्ममार्तंडाची पंडित धर्मदेव विद्यालंकारांची मदत घेतली होती. हिंदू कोड बिलाला हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे पाठिंबा देणारा कोणी आर्यसमाजी संस्कृत भाषेचा पंडित शोधून काढण्याची जबाबदारी त्यांनी (आंबेडकरांनी) सोहनलाल शास्त्रींवर सोपविली. शास्त्रीय शोधासाठी आपण त्याला पैसा देऊ. पैशामुळे त्याला लगाम लावता येईल असेही बाबासाहेब म्हणाले. सोहनलाल शास्त्रींच्या भाषेत - बाबासाहेब ने कहा की शिवाजी महाराज को शूद्र मानकर उसका ब्राह्मण राजतिलक नहीं करते थे, किंतु बनारस के एक पंडित घोघाभट्ट ने एक लाख रुपया दक्षिणा लेकर शिवाजी को क्षत्रिय घोषित करके उसके पुरखों को सूर्यवंशी क्षत्रियों की कड़ी में जोड़कर उसका राजतिलक या अभिषेक कर दिया था। तुम भी ऐसा घोघाबट्ट ढूंढो।[८५] पंडित विद्यालंकार यांना शास्त्री भेटले व त्यांनी नपुंसक पतीपासून घटस्फोट आणि एकुलती एक मुलगी असल्यास तिला पित्याच्या संपत्तीवर हक्क प्राप्त व्हावा हे सिद्ध करणारे श्लोक मनुस्मृतीमधून शोधून काढले व त्याबद्दल डॉ. आंबेडकरांनी स्वतः त्यांना पाच हजार रुपये मिळवून दिले.[८६]

दलवाईंचे इस्लामवरचे लेखन इस्लामला मोनोलिथिक स्वरूपात गृहीत धरून केलेले आहे. दुर्दैवाने अशा प्रकारची पद्धती एक तर मुस्लीम जमातवादी वापरतात किंवा हिंदू जातीयवादी. इस्लामचे स्वरूप स्थळ, काळाप्रमाणे वेगळे दिसते. इस्लामला प्रादेशिक गंध आहे. प्रादेशिक जीवनपद्धती इस्लामचे आकलन कसे करते याची नोंद घेणे अपरिहार्य असते. दलवाईंनी चित्रित केलेला इस्लाम बेघर सूफींना दर-बदर हुसकावितो. खाँसाहेबांच्या मैफली सुन्या करतो. मुलींचे शिक्षण बंद करवितो, संशयाचे जाळे विणतो, अदावतीची आग धगधगत ठेवतो, दंगलीचे पेव फोडतो. तरी दलवाईंना मुसलमान म्हणवून घेण्यासाठी वाद घालावा लागतो.

त्यांच्या समजेमध्ये असणाऱ्या इस्लाममुळे भारतीय मुस्लिमांमध्ये असणारी जातिव्यवस्था व तिचे दुष्परिणाम त्यांना दिसले नाहीत. हिंदू धर्मातील जातिव्यवस्था मोडायला समाजसुधारकांनी आयुष्य वेचले. तलाकपीडित मुस्लीम महिलांसाठी दलवाईंनी चळवळ उभारली. या प्रश्नात दुर्लक्ष करण्याची अक्षम्य चूक मुस्लीम समाजाने केली. दुखणे झाल्यावर त्यावर उपाय हवाच. पण दुखण्याचे मूळ दलवाईंनी शोधले नाही. मुस्लीम समाजाच्या शिव्या खाण्यात आणि समाजवाद्यांकडून आणि हिंदुत्ववाद्यांकडून होणाऱ्या कौतुकात त्यांची इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट काढावयाची राहून गेली. अशा संस्थेमार्फत मुस्लीम समाजातील तलाकांची कारणमीमांसा करता आली असती.

दलवाईंचा वैचारिक इमला स्वतः दलवाईंनी शिस्तबद्ध व्यासंगावर उभारलेला नाही. अतिशय मर्यादित स्रोत वापरलेले आहेत. वास्तविकपणे त्यांना हेकट मुस्लीम श्रोत्यांपेक्षा सुशिक्षित हिंदू मध्यमवर्गीय आणि मुस्लिमांचे प्रश्न समजून घेण्यापेक्षा दोषैक दृष्टीने त्यांच्याकडे पाहाण्याचा छंद असणारा श्रोतृवर्ग मिळाला. या कारणाने त्यांच्या विचारांची दिशा गोठून गेली.

दलवाईंनी कुरआन, हदीस, प्रेषित (स्व), प्रेषितांच्या (स्व) वेळचा इतिहास, जगातील व विशेषकरून भारतातील मुस्लिमांचा इतिहास सांगताना, स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास सांगताना जे विश्लेषण केले आहे ते वाचल्यानंतर हिंदू-मुसलमान आज एकत्र सहकार्याने कसे राहात आहेत हे पाहून आश्चर्याचा धक्का बसावयास हवा. हिंदू-मुस्लिमांचा संघर्ष धगधगते ठेवण्याचे सामर्थ्य दलवाईंच्या लेखनात आहे. वसंत पळशीकरांनी दलवाईंच्या लेखनासंबंधी एका वाचकाची प्रतिक्रिया दिली आहे. कोणत्याही सहृदय, विवेकी हिंदूला पुढील प्रतिक्रिया देणे बहुधा अनिवार्य होईल. १९६९-७०च्या समाज प्रबोधन पत्रिकेत ती आली आहे - 'मला स्वतःला मुस्लीम समाजाबद्दल अविश्वास आहे; पण सरसकट सर्वांना वाईट मानावे हे बुद्धीला पटत नाही. दलवाईंचे लिखाण वाचून एक मानसिक समाधान मिळते. ते हे की, ज्यांच्याबाबत आपण अविश्वास बाळगतो ते लोक तसेच आहेत. म्हणजे मग सदसद्विवेकबुद्धीची टोचणी नाहीशी होते.'[१७]

मौदुदी

कुरआनवर भाष्य करणाऱ्या जागतिक कीर्तीच्या विद्वानांमध्ये मौलाना मौदुदींचा समावेश होतो. 'तफहिमुल कुरआन' या कुरआन भाष्याचे अकरा खंड प्रकाशित झाले आहेत. लहान मोठी दीडशे पुस्तके त्यांच्या नावे आहेत. १९०३मध्ये औरंगाबादला त्यांचा जन्म झाला आणि १९७९ साली पाकिस्तानात त्यांचा मृत्यू झाला. १९७९मध्ये त्यांना सौदी अरेबियाचा शाह फैसल पुरस्कार मिळाला. त्यांचे धार्मिक विचार जगभर वाचण्यात आले व जगभर टीकेचे मोहोळ उठले. मोनोलिथिक इस्लामच्या पुरस्कर्त्यांनी मोनोलिथिक इस्लामच्या पुरस्कर्त्यांवर ही टीकेची तोफ डागली. मौलाना कांधवींनी 'फित्ना-ए-मौदुदी' नावाचे पुस्तक लिहून सर्वाधिक कटु टीका केली. समाजात निष्कारण व हेतुपुरस्सर वाद निर्माण करून फूट पाडणे असा 'फित्ना'चा अर्थ होतो. कुरआनमध्ये अशाच वाईट अर्थाने हा शब्द आला आहे.

मौदुदींनी लावलेला शोध

इस्लामकडे प्रार्थनापद्धती देणारा एक धर्म म्हणून न पाहाता, समुचित राजकीय व्यवस्थेच्या संरचनेचे तत्त्वज्ञान देणारा धर्म म्हणून मौदुदी पाहातात. त्यांनी जमाअते इस्लामी नावाची राजकीय संघटना स्थापन केली. भारतातील जमाअते इस्लामीने सुरुवातीस निवडणुकांमध्ये सहभाग नाकारला. काही वर्षानंतर शुद्ध चारित्र्याच्या व्यक्तीस मतदान करण्याचे आवाहन केले. इस्लाममधील राजकारणाची अनिवार्यता सांगण्यावर त्यांनी भर दिला.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुसलमानांमध्ये अनेक चळवळी सुरू झाल्या. इजिप्तमध्ये इख्वानी (Ikhwani), इंडोनेशियात माझुमी आणि भारतात मौदुदींची जमाअते-इस्लामी इत्यादी नावे या संदर्भात सांगता येतील. मौदुदींची चळवळ १९३०मध्ये सुरू झाली. गोलमेज परिषदांच्या आसपासचा हा कालावधी आहे. गांधीजींच्या हाती काँग्रेसचे नेतृत्व येऊन दहा वर्षांचा कालावधी झाला होता. या अगोदर दक्षिण आफ्रिकेतील चळवळींचा जबरदस्त अनुभव गांधीजींजवळ होता. आपल्याला लोकशाहीकडेच वाटचाल करायची आहे याची जाणीव मुस्लीम नेतृत्वास होऊ लागली होती. मौदुदींना नेमक्या ह्याच 'जाणिवेविषयी' चिंता वाटू लागली होती. ते लोकशाहीला 'पर्यायी' राजकीय व्यवस्थेच्या शोधात होते. 'तनकिहात' या पुस्तकात ते प्रथमतः इस्लामच्या शुद्धीकरणाची उपाययोजना सांगतात. गंमत अशी की, दलवाई शुद्ध बावनकशी इस्लामने इस्लामी जगताचा ताबा घेतला आहे असे गृहीत धरून चर्चा करतात किंवा वाद घालतात.

मौदुदींनी 'कुरआन की चार बुनियादी इस्तिलाहें' (कुरआनच्या चार मूलभूत परिभाषा) या पुस्तकात स्पष्ट केले की, श्रद्धा आणि प्रार्थना या इस्लामच्या विशेष बाबी नसून इस्लाम एक संपूर्ण निजाम (व्यवस्था) आहे. इस्लाममधील जिहाद (अल् जिहाद फी इस्लाम) मुस्लिमेतरांविरुद्ध धर्मयुद्ध नसून जगात प्रार्थना (सलाह) आणि भलाई (फलाह) निर्मितीसाठी आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर गोषा पद्धतीचे ते समर्थन करतात. भारतात अशा अनेक मुस्लीम जाती आहेत, ज्यांमधील स्त्रियांना उदरनिर्वाहासाठी वा पुरुषांना संसारात मदत करण्यासाठी गोषा सोडावा लागतो. त्यांना कुणी इस्लामबाहेर टाकत नाही.

मौदुदी व राष्ट्रवाद

मौदुदींनी राष्ट्रवादाची चर्चा केली आहे. अगदी अलीकडच्या

काळापर्यंत nation in imaginationची चर्चा पाहाता मौदुदींचे विचार बाळबोध आहेत. राष्ट्रवादाची चर्चा कोणत्याही अंगाने केली तरी ती राजकीय परिप्रेक्ष्यात असते असे असताना ते राष्ट्रवादाच्या दोन प्रकारांत राजकीय राष्ट्रवादाचा समावेश करतात. उरलेला प्रकार आहे धार्मिक राष्ट्रवाद. सामूहिक कार्यावर आणि सेक्युलॅरिझमवर राजकीय राष्ट्रवादाचा विश्वास असतो. निदान काँग्रेसला सेक्युलर लोकशाही पक्ष म्हणून मौदुदी मान्यता देतात. याचा अर्थ काँग्रेस उच्च मूल्यवादी पक्ष आहे म्हणून नव्हे तर 'सेक्युलर' ते हे हिणकस मूल्य मानतात म्हणून! पण विशेष म्हणजे गांधीजींची 'रामराज्याची कल्पना' राजकीय उद्दिष्टे अनुस्यूत असलेली संकल्पना आहे हेही मान्य करतात.[६८] मुस्लीम लीगने दिलेला नारा - 'पाकिस्तान का मतलब - ला ईलाहा - इल्लल्लाह!' हा देखील त्यांना सियासी (राजकीय) वाटला. त्यांच्या मते त्याचा गाभा राजकीय आहे.

मौदुदींमधील अंतर्विरोध स्पष्टपणे समोर येऊ लागतात. जिहाद 'सलाह' आणि 'फलाह'साठी आहे असे म्हटल्यानंतर ते विधान करतात - 'इस्लामचे आगमन यासाठी झाले नाही की, जगात कुफ्रची सत्ता असावी आणि मुसलमान शासित असावेत तर मुस्लीम शासक असावेत आणि मुस्लिमेतर शासित असावेत यासाठी झाले आहे.' हे उद्धरण कुरआनमधले नाही याची नोंद घ्यावी. पण ते दलवाईंच्या वैचारिक इमल्यास आधार ठरले असते.'[६९] मौदुदींनी या प्रसंगी केलेला गौप्यस्फोट विचार करायला लावणारा आहे. ते म्हणतात, हे लेखन करताना माझ्यात दीनी (धार्मिक) प्रेरणेपेक्षा कौमी (राष्ट्रीय - अर्थात मुस्लीम) प्रेरणा अधिक प्रभावी होती. याचा अर्थ दीनी प्रेरणा कौमी प्रेरणेपासून वेगळी आहे हे त्यांनी कबूल केले आहे. दलवाई आणि त्यांचे मार्गदर्शक इस्लामच्या संदर्भात या दोन्ही प्रेरणा एकच मानतात! म्हणजे धर्म आणि राजकारण अविभाज्य आहेत!

त्यामुळे मुस्लीम राजांचा इतिहास, साम्राज्यवादी शक्तीशी भारतीयांनी दिलेला लढा आणि शासकीय सुधारणांची खिरापत वाटण्याप्रसंगी झालेली चेंगराचेंगरी या चौकटीत चर्चा फिरत असते. मुस्लीम लीग चळवळीत उतरली नाही. टाइपरायटरच्या साहाय्याने मी पाकिस्तान मिळविले अशी बढाई जिना मारीत. वहाबी चळवळ, जमाअते उलेमा ए हिंद, देवबंद यांचा हेतू कदाचित मुस्लीम सत्ता स्थापन करण्याचा असेल. किडूक मिडूक राजपुत्रांनी शिवधनुष्य उचलण्याचे हे स्वप्न म्हणता येईल. पण त्यांनी ब्रिटिशविरोध केला हे मान्य करावे लागेल. परंतु दलवाईंच्या गुरुतुल्य मित्रांच्या - प्रा. कुरुंदकराच्या चाणाक्ष नजरेतून मुसलमानांची ही चलाखी सुटली नाही.

मुसलमानांच्या ब्रिटिशविरोधाचे टप्पे कुरुंदकर मांडतात[७०]-

(१) ब्रिटिशांच्या ताब्यातून हिंदुस्थान मुक्त करणे, (२) मग भारतावर ताबा मिळविणे, (३) ताब्यात आलेल्या भारतात मुस्लीम बहुसंख्याक करण्यासाठी प्रयत्न करणे आणि इस्लामी राज्य स्थापन करणे. धर्मवेड्या मुस्लीम पंडितांनी आखलेला कार्यक्रम त्यांनी कुठे वाचला याचा 'स्रोत' त्यांनी दिला नाही. 'जागर'च्या शेवटी संदर्भग्रंथ दिले असून त्यात पंचायत राज आणि क्रमिक पुस्तके लिहिणारे प्रा. व्ही. डी. महाजन यांच्या पुस्तकांचाही समावेश आहे. प्रत्यक्ष 'जागर' पुस्तकात उद्धरणे, मते कुठून येतात (आणि कुठे जातात) हे कळत नाही. कारण ते गुप्तच ठेवले आहे. दलवाईंनी याचे अनुकरण केले आहे. वाचकांचा हा गंभीर हक्कभंग आहे.

धर्मवेड्या मुसलमानांना वाटते परमेश्वर मुसलमानांच्या बाजूचा आहे, त्यामुळे मुसलमान संख्येने कितीही कमी असले तरी विजय त्यांचाच होतो. त्यामुळे जर मुसलमान परिपूर्णरित्या धर्मश्रद्ध असतील तर ते एकाच वेळी इंग्रज व हिंदू दोघांचाही पाडाव करू शकतील.'[७१] प्रेषित (स्व) उहदच्या लढाईत स्वतः सामील होते त्यात मुस्लिमांचा पराभव झाला. स्पेनमध्ये मुस्लिमांचा सफाया झाला. बरेलवीचा पराभव झाला. टिपूचा पराभव झाला. उद्गीरच्या लढाईत पराभव झाला. औरंगजेबाचा महाराष्ट्रात पराभव झाला हे सर्व मुस्लीम धर्मपंडित विसरले! मोहंमद मॉरमॅड्यूक पिकथॉल कुरआनच्या अनुवादात (दी मीनिंग ऑफ कुरआनमध्ये) सूरह ३ आयत २६मध्ये विशद करतात.

Say : O Allah! Owner of Sovereignty! Thou givest... याचा हिंदी अनुवाद मौलाना वहिदुद्दीन खान यांनी पुढीलप्रमाणे दिला आहे[७२]- 'तुम कहो - ऐ अल्लाह, सल्तनत के मालिक, तू जिसे चाहे सल्तनत दे और जिससे चाहे सल्तनत छीन ले। और तू जिसे चाहे इज्जत दे और जिसे चाहे ज़लील करे। तेरे हाथ में है हर खूबी। बेशक तू हर चीज पे कादिर है। मुसलमानांनाच सत्ता। राज्य (सल्तनत) देऊ असे अजिबात म्हटलेले नाही! एक तर देवबंदवाल्यांचा गैरसमज झाला आहे किंवा कुरुंदकरांचा. मुसलमानांना इतकी बेछूट छूट परमेश्वराने दिलेली नाही!

दलवाई आणि मौदुदी दोघांची व त्यांच्या निकटवर्तीयांची एक गफलत अशी झाली आहे की, त्यांना वाटते की, इस्लाम सैद्धांतिक चौकटीत ज्या शुद्ध स्वरूपात आहे तसा प्रत्यक्षात आणता येईल. दलवाईंप्रमाणे मौदुदी अंतर्विरोधात गुरफटलेले आहेत. तसे पाहिले तर दोघांचे प्रतिपादन प्रचारकी थाटाचे आहे. मौदुदींच्या दोन पुस्तिकांचा विचार करू. 'खुतबात' या पाच पुस्तिका आहेत. त्यापैकी पहिली पुस्तिका आणि 'इस्लामी निजामे हयात' या वेगळ्या पुस्तिकेचा विचार करू. या पुस्तिका मौदुदींच्या अंतर्विरोधाचे गहिरे रंग दाखवितात, यासाठी त्यांची निवड केली आहे. इस्लामी निजामे हयात १९७१ सालीच प्रकाशित झाली. त्या वेळी दलवाई हयात होते. स. मा. गर्गेंकडून त्यांनी ही पुस्तिका वाचून (वाचवून) घेतली असती तर काय प्रतिक्रिया आली असती याचा अंदाज येणे कठीण आहे. परंतु खुतबात भाग-१ने त्यांचे समाधान झाले नसते!

यात मौलाना मुस्लीम आणि काफिरमधील फरक सांगतात. ते एक आयत उद्धृत करतात जिचा अनुवाद आहे – 'आज मी तुमचा-प्रेषितांचा (स्व) धर्म तुमच्यासाठी परिपूर्ण केला आणि तुमच्यावर (स्व) आमची कृपा पूर्ण केली. आणि तुमच्यासाठी (स्व) एक बाब पसंत केली की तुमचा (स्व) दीन इस्लाम राहो.'[३३] आता मुसलमान कुणास म्हणावे आणि माणूस जन्मतः मुसलमान असतो का, असे प्रश्न मौदुदी उपस्थित करतात. घरवापसीच्या वेळी झालेली चर्चा आठवा. मुस्लीम धर्मपंडितांनी तेव्हा म्हटले होते की, मूल जन्मतः मुस्लीमच असते. मौदुदींची भूमिका अगदी याच्याविरुद्ध आहे. ते ठामपणे म्हणतात, इस्लाम वारशाने मिळत नाही. मुस्लीमत्व प्रयत्नपूर्वक मिळवावे लागते. स्वतःला मुस्लीम म्हणवून घेऊन कुणी मुस्लीम बनत नाही. प्रेषितांची (स्व) शिकवण समजून घेऊन त्यानुसार जीवनक्रम आखणे म्हणजे मुस्लीम असणे. ते म्हणतात – ब्राह्मणाचा मुलगा मात्र जन्मतः ब्राह्मण असतो. तो संस्कृत मंत्र म्हणत असला तरी त्याला त्यात काही कळत नाही. मौदुदींना आपण विचारू या की, असंख्य मुसलमानांना अरबी कळत नाही; पण त्यांचा ईश्वर, प्रेषित (स्व), कुरआनवर विश्वास आहे, अशांचे काय? आणि दलवाई तर या परिभाषेत बसत नाही. पण दलवाईंना कुणाची परवानगी लागत नाही. आणि जागा लागते मौ. मदनी, मौ. आजाद, मौ. मौदुदी आणि सोझ यांच्या पंक्तीत!

मुस्लीम आणि काफिरमधील फरक सांगताना मौदुदी म्हणतात, मुस्लिमांस स्वर्ग आहे तर काफिर त्यापासून वंचित आहेत. माणूस म्हणून दोन्ही समान आहेत. फरक पडतो इस्लाममुळे! इस्लाम म्हणजे ईश्वराच्या आज्ञा पाळणे, तर कुफ्र म्हणजे अल्लाहच्या आज्ञा न पाळणे. मुसलमान आणि काफिर यांमधील विभाज्यरेषा आहे इस्लामचे ज्ञान व या ज्ञानाप्रमाणे वागणूक. सूरह बक्रची ६१वी आयत मौदुदी उद्धृत करतात – 'जे ईश्वराने संकटात टाकले त्याच्यावर अपमान आणि वंचितता लादण्यात आली आहे. हे यासाठी की, ते ईश्वराच्या आयती नाकारत होते. प्रेषितांना नाहक ठार करीत होते. आणि यासाठी की, ते ईश्वराच्या आज्ञा पाळत नव्हते आणि मर्यादांचे उल्लंघन करणारे होते.' 'नाही कुणी पूजनीय, अल्लाहशिवाय आणि प्रेषित मुहंमद (स्व) त्याचे प्रेषित आहेत' – याला 'कलमे तय्यीबा' असे म्हणतात. जीवनात याचे आचरण करणाऱ्यास मुस्लीम म्हणतात. इस्लामने जे करावयास सांगितले ते करणे व ज्यापासून प्रतिबंध केला ते न करणे म्हणजे इस्लामचे ज्ञान असणे आहे. ते म्हणतात, 'दहरिया' (नास्तिक) कहता है की खुदा नहीं है. जमीं और आसमान की हर चीज कहती है की तू झूठा है.[३४] दलवाईंशी तर त्यांचे भांडणच झाले असते.

मग मौदुदी अनेकेश्वरवाद्यांकडे वळतात. मुश्रीक कहता है की खुदाई में दुसरे भी अल्लाह के शरीक है, दुसरे भी राजिक है, दुसरे भी मालिक है, दुसरे भी किस्मते बनाते है और बिगाडते है, दुसरे भी नफा और नुकसान पहुँचाने की ताकत रखते है, दुसरे भी दुआएँ सुननेवाले है, दुसरे भी मुराद पूरी करनेवाले है, दुसरे भी डरने के लायक है, दुसरे भी भरोसा रखने के काबिल है, इस खुदाई में दुसरे का भी हुक्म चलता है और खुदा के सिवा दुसरों का फर्मान और कानून भी पैरवी के लायक है.[३५] मौदुदीचे हे उद्धरण जगातील कोणताही मुस्लीम धर्मपंडित नाकारू शकणार नाही.

इस्लामचा संदेश देण्याचा हा पवित्रा उलेमाचा आहे. खूप बारकावे असणारा आणि सर्वसामान्य मुसलमानांना पेचात पकडणारा आहे. प्रेषितांनी (स्व) ज्या वेळी कुरैशांना एकेश्वरी श्रद्धेचा संदेश दिला, त्या वेळी कुरैशांनी एक प्रश्न विचारला की, प्रेषित (स्व) सर्व ३६० देवता एकाच अल्लाहमध्ये एकवटत आहेत काय? म्हणजे या ३६० देवतांची कार्ये एक अल्लाहच करणार आहे काय? कुरैश वंशात प्रेषितांचा (स्व) जन्म झाला. कुरैशांमधील मातब्बर लोक त्यांच्या (स्व) नात्यातले होते. प्रेषितांवर (स्व) ते प्रेषित होण्यापूर्वी प्रेम करणारे होते. अनेकेश्वरवाददेखील एक मानवी प्रवृत्ती आहे. लोकशाहीच्या काळात मौदुदींना मुसलमानांमध्ये खरे मुसलमान व नावाचे मुसलमान कोण हे 'सॉर्टिंग' करण्याची वेळ आली. धर्माच्या आधारावर निर्माण झालेल्या पाकिस्तानात त्यांना-त्यांच्या जमाअते इस्लामीचे सरकार बनविता आले नाही. भारतात हिंदू आणि मुसलमानांमध्ये तफावत दर्शवून हिंदू-मुसलमानांमधला संघर्ष त्यांना तेवता ठेवायचा आहे असे स्पष्टपणे दिसते. दोन विरुद्ध दिशांना प्रवास करीत कळत नकळत दलवाई व मौदुदींच्या गाड्या एकाच स्टेशनावर येण्याची किमया समाजशास्त्रात होऊ शकते.

मौदुदींचा धक्का

मी मागे म्हटल्याप्रमाणे मौदुदींनी धक्कातंत्राचा अवलंब केला आहे. 'इस्लामी निजामे हयात' ही पुस्तिका मौदुदींना जगातील अव्वल दर्जाच्या उदारमतवाद्यांच्या रांगेत बसविते. संशयाला जागा आहे की, दलवाई आणि मौदुदी यांमध्ये उल्लेखलेला अंतर्विरोध हा अंतर्विरोध नसून तो डावपेचाचा भाग आहे. दलवाईंमधील मुसलमानत्व नाकारण्यासाठी मौदुदींची गरजच भासत नाही. पण मुस्लीम राहून मुसलमानांवर टीका केल्याशिवाय आत्मटीका कशी होणार? मौदुदींनी तर 'यू' टर्न घेतला आहे. वास्तविकपणे मुस्लीम व काफिर यांमधील फरक रंगवून थकलेल्या मौदुदींना साक्षात्कार झाला. हा मनापासून असला तर त्यांचे अभिनंदन करावयास हवे.

इस्लाम का निजामे हयात

'इस्लाम का निजामे हयात'[३६] या पुस्तिकेत 'अखलाकी निजाम' या शीर्षकाने चारित्र्य कसे असावे यांची चर्चा मौलाना करतात. ते म्हणतात की, माणूस निसर्गतः काही गोष्टी पसंत करतो तर काही नापसंत. सत्य, न्याय, शील, वचनपूर्ती,

दुसऱ्याने सांभाळण्यासाठी दिलेल्या वस्तूंची परतफेड, हे गुण चारित्र्यनिर्मिती करतात तर असत्य, अन्याय, बेछूटपणा, वचनभंग इत्यादी दोष चारित्र्यास मारक असतात. सहवेदना, दया, औदार्य पात्रता यांची प्रशंसा केली जाते तर स्वार्थ, कठोरता, कृपणता, संकुचित दृष्टी यांना कधीच समाजमान्यता मिळालेली नाही. इस्लामी तत्त्वे आणि हदीस जीवनातील व्यक्तिगत व सामूहिक मूल्ये यांना सदोदित ताजीतवानी ठेवतात. ईश्वराचे भय अनेक दुष्कृत्यांपासून दूर ठेवते. विवेकाधारित राजकीय व्यवस्था आणि तिचे नियम मानवी जीवन सुखकर बनवतील. परंतु यासाठी बाहेरून दबाव येण्यापेक्षा आतून दबाव आला पाहिजे. सर्वदूर ईश्वराचे अस्तित्व आहे याची खात्री झाली की, विवेक जागृत व्हावयास वेळ लागणार नाही.

इस्लामी राजकीय व्यवस्थेचा तपशील देताना या व्यवस्थेच्या तीन आधारांचा उल्लेख मौदुदी करतात - (१) तौहीद, (२) रिसालत आणि (३) खिलाफत

(१) **तौहीद** - तौहीद म्हणजे ईश्वर सर्वार्थाने स्वामी आहे. त्याच्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा कुणाला अधिकार नाही. ईश्वरी आज्ञा कायदा आहे. (२) हा कायदा प्रेषितामार्फत (स्व) लोकांपर्यंत पोहोचतो ही **रिसालत** आहे. प्रेषितांनी (स्व) आपल्या जीवनात या नियमांची अंमलबजावणी केली आहे. माणसाला काही अधिकार देण्यात आलेले आहेत तो नायब आहे म्हणजे उपभोगणारा आहे. (३) मालक न बनता नियमाप्रमाणे सर्वांवर नियंत्रण ठेवणे ही **खिलाफत** आहे.

ज्या वेळी एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस आपल्या मालमत्तेची निगराणी करायला सांगते त्या वेळी चार बाबी ठरलेल्या असतात - (१) निगराणी करणारा मालक नाही, (२) निगराणी करण्याची पद्धत ठरलेली आहे, (३) आपल्याला असणाऱ्या अधिकारांच्या मर्यादेत हे काम व्हावयास हवे, (४) ज्याने मालमत्ता ठेवली आहे त्याच्या इच्छेप्रमाणे मालमत्तेची देखभाल व्हावी. खिलाफत या प्रारूपावर चालते. खलिफा राज्याचा मालक नसतो. खिलाफत ईश्वराने दिलेली असते.

मौदुदी म्हणतात की, खिलाफत एखाद्या व्यक्तीस किंवा घराण्याला मिळालेली नसते. **खलिफा राज्याचा स्वामीही नसतो. प्रत्येक व्यक्ती खिलाफतीत समानतेने भागीदार आहे (जाड ठसा माझा)**. दुसऱ्यांचे हक्क रद्द करण्याचा अधिकार कुणाला नाही. मौदुदी लोकशाहीचा उल्लेख स्पष्टपणे करतात. त्यांच्याच शब्दात रियासत का नज्म व नसक (संघटन व व्यवस्था) चलाने के लिए जो हुकूमत बनाई जायेगी वोह इन्ही अफराद (व्यक्ती) की मर्जी से बनेगी.[७७] यही लोग अपने अखतियारात (हक्क) खिलाफत का एक हिस्सा इसे सौंपेंगे. इस के बनाने में इनकी राय शामील होगी और इनके मशवरेसे (सल्ल्याने) वोह चलेगी. जो इसका एतिमाद (विश्वास) हासिल करेगा वोह इन की तरफ से खिलाफत के फराईज (कर्तव्ये) अंजाम देगा (प्रत्यक्षात आणेल) और जो इनका एतिमाद खो देगा तो इसे हुकूमत के मनसब से (पदावरून) हटना पडेगा. ही सर्व संरचना लोकशाहीची आहे. या पद्धतीस मौदुदींनी जंभूरी खिलाफत-इस्लामी लोकशाही म्हटले आहे. ती ईश्वराच्या नावे चालते. चांगले काय, वाईट काय याचे भान व्यक्तीला येते. दुसऱ्यांच्या हक्कांची कदर व्यक्ती करते.

एका वेगळ्या कल्याणकारी राज्याची संकल्पना मौदुदींनी मांडली आहे - स्त्रियांच्या संरक्षणाची हमी दिली आहे. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या गरजा पूर्ण केल्या जातील. आजारी आणि जखमींची शुश्रूषा केली जाईल. या प्रकारच्या हक्कांना मूलभूत हक्कांचा दर्जा दिला जाईल. जगाच्या कानाकोपऱ्यात जन्मलेल्या व्यक्तीने इस्लामी राज्यात प्रवेश केल्याबरोबर त्याला सर्व मूलभूत हक्क प्रदान केले जातील. इतर नागरी हक्कांच्या संदर्भात हाच नियम लागू पडेल. फौजदारी व दिवाणी कायदे - मौलानांच्या भाषेत **जिम्मींनाही सारखेच राहतील. एवढेच नव्हे तर जिम्मींच्या पर्सनल कोडमध्ये जंभूरी खिलाफत हस्तक्षेप करणार नाही' (जाड ठसा माझा). 'जिम्मींना त्यांचे रीतिरिवाज पाळण्याचे, धर्माप्रमाणे आराधना करण्याचे स्वातंत्र्य राहील. जिम्मी धर्मप्रसार करू शकतील व कायद्याच्या चौकटीत त्यांना इस्लामवर टीका करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे (जाड ठसा माझा). जंभूरी खिलाफतमधील गैरमुस्लीम लोकांच्या संरक्षणासंबंधी मौदुदी म्हणतात, 'गैरमुस्लीम जनतेवर शरीयतीविरुद्ध थोडीसुद्धा दांडगाई करता येणार नाही. आमच्या सरहद्दीबाहेर जरी सर्व मुसलमानांना ठार करण्यात आले तरीही आम्ही आमच्या हद्दीत एकाही जिम्मीचे रक्त वाहू देणार नाही.'**[७८]

या दोन पुस्तिकांमधील मौदुदींचे विचार वाचल्यानंतर पुढील प्रश्न उपस्थित होतात.

(१) खुतबात-(पहिले पुस्तक)मध्ये गैरमुस्लिमांना 'काफिर' संबोधले गेले. वास्तविकपणे 'काफिर' ही संज्ञा वापरणेच बंद झाले पाहिजे. जन्माने मुस्लीम नसणाऱ्यासही. मुसलमानांना 'चांगले' वागण्याचा सल्ला द्यावयास हवा.

इस्लाम तीन प्रकारात अस्तित्वात राहू शकतो. फक्रुद्दीन बेन्नूरांनी हे स्पष्ट केले आहे.

(अ) राजकर्त्यांचा-उलेमांचा-अश्रफवर्गाचा इस्लाम

(ब) सूफींचा इस्लाम आणि

(क) धर्मांतरित भारतीय वंशाच्या मुसलमानांचा हिंदुस्थानी इस्लाम ज्याला इम्तियाज अहमदसारख्या समाजशास्त्रज्ञाने Lived Islam हे नाव दिले आहे.[७९] याला आपण जगला जाणारा वा व्यवहारातला इस्लाम म्हणू. सर्वसामान्य मुस्लीम 'थोडासा' उलेमांच्या सल्ल्याने वागतो. वैष्णोदेवीच्या भाविकांना घोड्यावरून देवीपर्यंत घेऊन जाऊनही मुस्लीम घोडेवाला मुस्लीमच राहतो. इतरत्र देवीची आभूषणे विकणारे मुस्लीमच असतात. किती उदाहरणे द्यावीत.

आपले आसन सोडून सर्वसामान्य मुसलमानांमध्ये फिरण्याची तसदी ना दलवाईंनी घेतलेली दिसते ना मौदुदींनी. राज्यकर्त्या

आणि अश्रफांच्या इस्लामच्या वर्तुळात हे राहिले. दलवाई आणि मौलाना सूफींबद्दल बोलत नाहीत. कुणी फार उदार झाले की, दारा शिकोहबद्दल बोलतात. दारा शिकोह यांचे योगदान नेत्रदीपक आहे. पण ते राजकीय सत्तास्पर्धेत होतेच. राजसत्तेला काडीची किमत न देणाऱ्या निजामुद्दीन यांचे नाव दोघांच्या लेखनात अनुपस्थित. खरे तर सूफींचा इस्लाम हाच हिंदुस्थानी इस्लाम आहे. माणसाला माणूस म्हणून ओळखणारा. माणसातले अमाणूसपण साफ करणारा. कुणालाही काटा रुतला तरी आक्रंदणारा.

मौदुदी आणि इतर 'काफिर' शब्द वापरतात, त्याला हिणकस लेखून. सूफी कुणाला काफिर म्हणत नाही. काफिराला स्वर्ग नाही अशी चर्चा किती होते. सूफी हजरत नूरी यांनी परमेश्वराकडे केलेले मागणे उद्धृत करतो, 'हे अल्लाह! तुझे ज्ञान, सामर्थ्य आणि इच्छाशक्तीला मर्यादा नाहीत. तूच निर्माण केलेल्या लोकांनी नरक भरून राहावा अशी तुझी अतूट इच्छा असेल; तर केवळ मला नरकात टाकून नरक भरून काढण्याचे सामर्थ्यही तुझ्यात आहे. मला नरकात टाक आणि नरकातल्या लोकांना स्वर्गात पाठव.'[८०]

(२) इस्लामी-निजामे-हयात ही पुस्तिका मौदुदींनीच लिहिली आहे का, अशा संभ्रमात मी पडलो. अर्थात संभ्रम दूर झाला आणि खात्री पटली की, असे तेच लिहू शकतात. बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल की, अशी राजवट भारतात निर्माण होऊ शकत नाही. ज्या वेळी सर्वांना समान अधिकार देण्याची भाषा करीत ते 'जिम्मी' हा शब्दप्रयोग करतात त्या वेळी अशी राजवट मुस्लीम बहुसंख्याक देशातीलच असू शकते. मौदुदींची दौड पाकिस्तानपर्यंत.

(३) नंतरची गंमत अशी की, तेथे जिम्मी बिचारे आहेत तरी किती?

(४) जिम्मी आले की, जिझिया आला. त्या विषयी चलाखीचे मौन बाळगलेले आहे.

(५) कोणीही या नागरिक बना. अधिकार आणि मूलभूत हक्कांची खिरापत घ्या. पण देश असतो. संविधान असते. कायदे असतात - 'आवो जावो घर तुम्हारा' असे नसते. पाकिस्तानात कोण कशाला जाणार? भारताचे गद्दारसुद्धा जायला तयार नाहीत.

(६) सगळ्यात कहर केला आहे की, कुणी मुस्लिमांना बाहेर ठार करा, आम्ही आमच्या हद्दीत म्हणजे पाकिस्तानात गैर-मुसलमानास धक्का लावणार नाही. पाकिस्तानात गैरमुसलमान राहू तरी किती दिलेत? भारतातील मुसलमान, पाकिस्तानातील मुसलमानांपेक्षा खूप जास्त सुखी आहेत. सुरक्षित आहेत.

याच पुस्तिकेत मौदुदी मुआशरी निजामबद्दल (सामाजिक व्यवस्था) लिहितात. आदमपासून मानवजात निर्माण झाल्याने ती बंधुभावाने बांधली गेली आहे. माणसामाणसांमधील भेदांना इस्लाम काटशह देतो : ते म्हणतात – इन इख्तेलाफात (भेद) के बिना (आधार) पर इन्सानों में रंग, जबान (भाषा), कौमीयत (जात, धर्म) और वतनीयत (राष्ट्रीय भावना) के जो तआस्सुबात (वैर) पैदा हो गये है इन सबको इस्लाम गलत करार देता है.[८१] समाजातील विषमता व अस्पृश्यता दूर केली जाईल.

मौदुदी लोकांच्या आध्यामिक व्यवस्थेविषयी (रुहानी निजाम) लिहितात. आत्मा शरीराच्या बंदिवासात आहे. त्यांच्या प्रवासाच्या दिशा भिन्न आहेत. भौतिकता स्वीकारली, त्यात माणूस बुडाला; आध्यात्मिकता स्वीकारली माणसाने शरीरदमनाचे मार्ग स्वीकारले. तपश्चर्येसाठी तो अरण्यात गेला. भौतिकतेच्या मागे लागणाऱ्या माणसाला 'सुंदर' सुसर, उमदा घोडा आणि यशस्वी (खरं तर लबाड) लांडगा व्हावेसे वाटते. तर आध्यात्मितेकडे जाणाऱ्याला विविध क्षमतांचा धनी व्हावेसे वाटते – रेडिओसारखा, दणकट दुर्बिणीसारखा आणि नाजूक सूक्ष्मदर्शक यंत्रासारखा किंवा केवळ दृष्टीनेच बरा करणाऱ्या दवाखान्यासारखा. (म्हणजे आध्यामिक शक्ती प्राप्त करून 'या' यंत्रांसारख्या क्षमता आपल्यात याव्यात). इस्लामी परिप्रेक्ष्यात ईश्वराने आत्म्याला पृथ्वीवर त्याचा प्रतिनिधी–खलिफा म्हणून पाठविले. त्याच्यावर कर्तव्ये व जबाबदाऱ्या टाकल्या. त्याला सुंदर शरीर दिले. शरीर आत्म्याचा कैदखाना नसून कारखाना आहे. आत्मा शरीरात फसल्यासारखा नाही. शरीर कार्य करण्यासाठी मिळालेली देणगी आहे म्हणून माणूस उदासीन राहू शकत नाही. ईश्वरासाठी तो कार्यरत झाला तर ईश्वरासमीप पोहोचेल.

जगात सेक्युलॅरिझम लोकप्रिय होत चालल्याने आणि पाश्चिमात्य संस्कृतीतील आधुनिकीकरणाचे वारे सोसाट्याने वाहावयास लागल्याने त्यांचा प्रतिरोध करण्यासाठी इस्लामी धर्मविचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयास मौदुदींनी त्यांच्या परीने केला आहे. त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी धर्माचा अभ्यास त्यांना निश्चितच वेगळ्या पद्धतीने करावा लागला असेल. या अभ्यासावर जागतिक पातळीवर प्रतिक्रिया आल्या. दलवाईंच्या लेखनात अशा अभ्यासाचा अभाव आहे. त्यांनी युक्तिवाद करण्यावर भर दिला आहे. गमविण्यासारखे दलवाईंजवळ काही नसल्याने ते आक्रमक वाटतात. मौदुदींजवळ धार्मिक कट्टरता आहे. आपली नखे पंज्यामध्ये कशी व केव्हा लपवावी याची कला त्यांच्याजवळ आहे. विचारवंतांची संरक्षक फळी दलवाईंच्या मागे असल्याने त्यांना या कलेची गरज भासली नाही.

चारही दिशांनी इस्लामवर इतकी टीका केली जाते की, मुस्लिमांना बचावात्मक पवित्राच घ्यावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू व इस्लाम धर्मांवर टीका केली. त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू धर्मात सुधारणांची चळवळ सुरू झाली. या चळवळीचा काही हिस्सा निश्चितपणे पुनरुज्जीवनाकडे वळला. परंतु हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानास उभारी आली. इस्लाममध्ये सूफी सोडल्यास तत्त्वज्ञानाचा अंगीकार अधिक प्रमाणात झाला नाही. परंतु सूफी तत्त्वज्ञानही प्रगल्भ आहे यात शंका नाही. सूफींच्या मिशनरी कार्यात दीर्घ काळ सातत्य राहिले.

मौदुदींच्या कुरआन भाष्यावर टीका झाली हे खरे परंतु त्यात नावीन्य आहे हे खरे आहे. परंतु डॉ. फरिदा खानम यांनी मौदुदींच्या काही विश्लेषणावर आक्षेप नोंदविले आहेत. फारशा तांत्रिकतेत न जाता आपण त्यांपैकी काही आक्षेपांची चर्चा करू. यासाठी तफहिमुल कुरआन मुकद्दमाह (प्राक्कथन) दुसऱ्या खंडातील सूरह तौबाची ३३वी आयत आणि सूरह फतेहची अठ्ठाविसावी आयत, नमुन्यासाठी घेता येईल. सारांशाने सांगता येईल की, प्रेषितांना (स्व) ईश्वराच्या सार्वभौमत्वाखाली एक विशिष्ट प्रकारची जीवनपद्धती देऊन पाठविले आहे. त्यांना (स्व) तिची अंमलबजावणी करावयाची आहे. जर लोक अनेकेश्वरवादी असतील व त्यांना समझोता करावयाचा नसेल तर धर्मास पूर्णतः वर्चस्व प्राप्त झाले पाहिजे, असे सार सर्व आयतींचे आहे. हाच मुद्दा मौदुदींनी इस्लामी सियासतीच्या तिसऱ्या खंडात मांडला आहे.

त्याचप्रमाणे सूरह अल-सफाच्या नवव्या आयतीचे स्पष्टीकरण करताना मौदुदी म्हणतात – या आयतीत समजाविले आहे की, भौतिक जगात जीवन कसे व्यतीत करावे. 'दीन' या शब्दाचा अर्थ जवळजवळ 'राज्य' असा घेतला आहे. 'दीन-ए-हक' म्हणजे माणसाने माणसाची ताबेदारी सोडून फक्त ईश्वराची (हक) ताबेदारी स्वीकारावी. ईश्वराने पाठविलेले प्रेषित (स्व) असा 'दीन' घेऊन आले आहेत. एका 'ठिकाणी मौदुदींनी मुसलमानास 'खुदाई-फौजदार'[८२] म्हटले आहे.

कुरआनच्या इतर भाष्यकारांचे भाष्य मौदुदींच्या भाष्याशी मेळ राखत नाही. फरिदा खानम यांच्याच शब्दांत (मराठी अनुवाद) जगातील सर्वप्रेषित ईश्वराचा एकच संदेश घेऊन आले. सूरह शूराची तिसरी आयत आणि सूरह अनआममधील ८३ ते ८६ आयती याचाच पुनरुच्चार करतात. प्रेषितांनी राज्य स्थापन केले पाहिजे असे नाही. रिवायती (परंपरागत) भाष्यकार मौदुदींना विरोध करतात.

मौदुदींच्या लेखनात इस्लामच्या दृष्टीने एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेचा उल्लेख करावयाचा राहून गेला आहे. दलवाईंकडून तशी अपेक्षा नाही. दुर्दैवाने दोन्हीची दृष्टी इस्लामचे मोनोलिथिक प्रारूप मांडण्यावर असल्याने अशा बाबी सुटायच्याच. अ. भि. शहांनी म्हटले आहे की, त्यांनी (दलवाईंनी) इस्लामकडे चिकित्सक वृत्तीने पाहिले. जे चांगले होते त्याचा स्वीकार केला; जे वाईट होते ते कोणत्याही प्रकारचे आढेवेढे न घेता नाकारले.[८३] दलवाईंशी जवळीक असणारे थोर विचारवंत हे वाक्य अनेकदा उच्चारतात. दलवाईंच्या मते इस्लाम धर्म

संपूर्णतः टाकाऊ आहे असा निष्कर्ष काढला तर तो चुकीचा ठरू नये, कारण त्यांनी इस्लामच्या चांगल्या बाबींबर पाच पाने तरी लिहून ठेवलीत काय? आणि समाजवाद्यांनी दलवाईंच्या वैचारिक दोषांवर पानभर तरी लिहिले आहे काय? त्यांनी दलवाई नावाचा एक सॅक्रोसॅंक्ट (sacrosanct) पंथच निर्माण केला आहे. मौदुदींना जमातवादी म्हटले जाते. ते खरे आहे. इतर मौलानांनी त्यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी इस्लामची जी प्रतिमा सादर केली आहे त्यावरून भरपूर वाद झाले आहेत.

प्रेषितांच्या (स्व) अंतिम हजच्या घटनेचा उल्लेख केला पाहिजे. त्यांच्यासमवेत एक लाख वीस हजार अनुयायी होते. महिला आणि गुलामांच्या हक्कांवर जोर देणारे प्रवचन त्यांनी दिले. या सर्व अनुयायांना इस्लामचा संदेश देण्यासाठी जा अशी आज्ञा केली. या अनुयायांचे तोंड ज्या दिशेला होते त्या दिशेला अनुयायांनी कूच केले. पायी, घोड्यांवर, उंटांवर. निःशस्त्र उदरनिर्वाहाची, कुटुंबाची पर्वा न करता. इस्लामचा प्रसार असाही झाला हे दलवाई सांगत नाहीत व मौदुदीही सांगत नाहीत.

सध्याच्या काळात भारतीय संविधानाने दलवाईंनी आणि मौदुदींनी व्यक्त केलेल्या व निर्माण केलेल्या सर्व समस्यांचे निराकरण केले आहे. कोणी कोणता धर्म स्वीकारावयाचा, स्वीकारू शकता. धार्मिक स्वातंत्र्य दिले त्यावर मर्यादा घातल्या. व्यक्तिविकासाची दालने उघडून दिली. विकासाच्या सर्व वाटांचा नकाशा दिला.

संदर्भ –

१. दलवाई, हमीद – इंधन (पाचवी आवृत्ती २००१) मुंबई, मौज प्रकाशन.
२. कुरुंदकर, नरहर – जागर (तिसरी आवृत्ती १९९४) पुणे, देशमुख आणि कं. (पब्लिशर्स) प्रा. लि., पान १८६.
३. कित्ता पान २११.
४. तांबोळी, प्रा. शमसुद्दीन (सं) – हमीद दलवाई – क्रांतिकारी विचारवंत, द्वितीय विस्तारित आवृत्ती (एप्रिल २०१४) मध्ये कुरुंदकर नरहर – माझी दलवाईंशी पहिली भेट – पान १७.
५. कित्ता पाने १७–१८.
६. कित्ता पान ७३.
७. कित्ता पाने ४८–५१ ...क्रांतिकारी विचारवंत – गर्गे स. मा. – मुस्लीम समाजसुधारक.
८. पूर्वोक्त – जागर, पान १८६.
९. पूर्वोक्त – क्रांतिकारी विचारवंत, पाने १२२–२५.
१०. पाठक, महामहोपाध्याय श्रीधरस्वामी – अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ (तिसरी आवृत्ती) प्रकाशक व्यंकटराव रणधीर, बोराडी (जि. धुळे), जून २०१०, प्रस्तावना, पान १५, प्रस्तावनेचे लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी.
११. कुरुंदकर–जागर–पूर्वोक्त पान १७६.
१२. कित्ता पान १८१.
१३. कित्ता पाने १८१–८२.
१४. कित्ता पान १८२.
१५. कित्ता पान १७९.
१६. कित्ता पान १७५.
१७. कित्ता पान १९४.
१८. सिन्हा व्ही. के. (सं) – सेक्युलॅरिझम इन इंडिया, ललवाणी पब्लिशिंग हाऊस १९६८, या ग्रंथात अय्यर एस. पी. – सेक्युलॅरिझम ॲन्ड स्कूल टेक्स्ट बुक्स, पान १२०.
१९. ब्रह्मे, सुलभा – हिंदू मुस्लीम तणाव आणि भारतीय एकात्मता – पुणे, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय प्रकाशन १९९२, पान १७.
२०. डॉ. इरफान हबीब – मिडिव्हल पॉप्युलर मनिथेइझम ॲन्ड ह्युमॅनिझम : दी हिस्टॉरिकल सेटिंग – सोशल सायंटिस्ट २३८–३९, व्हॉल्यूम २१, नंबर्स ३–४, मार्च–एप्रिल १९९३, पान ७८.
२१. पूर्वोक्त – तांबोळी (सं) क्रांतिकारी विचारवंत या पुस्तकात गर्गे स. मा. – मुस्लीम समाजसुधारक – या लेखात दलवाईंची घेतलेली मुलाखत, पान ५३.
२२. कित्ता (तांबोळी (सं) दलवाई – 'क्रांतिकारी विचारवंत' मध्ये दलवाई – महंमद अली जिना; मुस्लीमनेतृत्वाचा एक अभ्यास, पान १२८.
२३. तेज – दिल्ली, मार्च २०, १९२६ उद्धृत कुरेशी आय. एच. – उलेमा इन पॉलिटिक्स, (दिल्ली रेनेसाँ पब्लिशिंग हाऊस, सी–९, जितानगर), पान २८२.
२४. कित्ता पान २८५.
२५. पूर्वोक्त तांबोळी (सं) हमीद दलवाई..., पान १२४.
२६. कित्ता पान १२१.
२७. दलवाई हमीद – राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान – पुणे, साधना प्रकाशन – १ मे २००२, पान ३३.
२८. आर्मस्ट्राँग कॅरेन – मुहंमद–प्रॉफिट फॉर अवर टाइम – लंडन हार्पर पेरेनियल २००६, पान १३०.
२९. कित्ता पान १३०.
३०. कित्ता पाने १३०–३१.
३१. जकेरिया मौ. मुहंमद – फजाइल–ए–आमाल, खंड २, प्रकाशक जव्वाद बुक डिपो, दिल्ली ६, पान ३०२.
३२. कित्ता पान ३५१.
३३. पाहा इब्ने हिशाम – सिराह खंड १ पान ६०१, गियांग (अनु.) लाइफ ऑफ मुहंमद, पान २८६.
३४. पूर्वोक्त दलवाई – राष्ट्रीय एकात्मता, पान ३१.
३५. खान अब्दुर्रशीद (अनु. डॉ. अलीम वकील) – मुहम्मद (स्व) – त्यांचे विवाह आणि दैवी कार्य –

सोलापूर नजमुस्साकिब १९९६, पान १५६.

३६. पूर्वोक्त - राष्ट्रीय एकात्मता..., पान २५.

३७. कित्ता पान २५.

३८. इरफान हबीब (अनु. विजया कुलकर्णी) - मध्ययुगीन भारत - एका संस्कृतीचा अभ्यास, नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया २०१३, पान १२०.

३९. कित्ता पान १२०.

४०. कित्ता पान १८३.

४१. डॉ. मोरे सदानंद - लोकमान्य ते महात्मा - पुणे, राजहंस प्रकाशन २००७, पान ६५४.

४२. कित्ता पान ६५४.

४३. एम. जे. अकबर (अनुवाद-रेखा देशपांडे) ज्वालाग्राही पाकिस्तान पुणे, चिनार पब्लिकेशन्स २०१२, पान ११३.

४४. पूर्वोक्त दलवाई - राष्ट्रीय एकात्मता ....., पान ३०.

४५. तांबोळी - पूर्वोक्त पळशीकर - मुस्लीम जातीयवादाची हमीद दलवाईकृत मीमांसा, पान ७५.

४६. कित्ता पान ८२.

४७. भावे श्री. मा. (सं) काँग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला या ग्रंथाचा प्रतिवाद, पुणे राजहंस प्रकाशन, या ग्रंथात बेन्नूर फक्रुद्दीन-विपर्यस्त मांडणी करणारा ग्रंथ, पान ९५.

४८. पांडे बिश्वमोहन - हिस्टोरिओग्रॅफी ऑफ पाकिस्तान- नवी दिल्ली, ॲटलांटिक पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर्स २००३, पान ७६.

४९. तांबोळी पूर्वोक्त - क्रांतिकारी विचारवंत... मध्ये पळशीकर वसंत मुस्लीम जातीयवादाची..., पाने ८५-८६.

५०. कित्ता पान ९०.

५१. कित्ता पान १००.

५२. दी टाइम्स ऑफ इंडिया, नोव्हेंबर २, २०१२.

५३. तांबोळी - पूर्वोक्त क्रांतिकारी..., पाने १४८-१५३.

५४. कित्ता पान १४८.

५५. पुनियानी राम - कम्युनल पॉलिटिक्स - फॅक्ट्स व्हर्सेस मिथ, नवी दिल्ली, सेज पब्लिकेशन्स २००३, पान १४६.

५६. ऑपरेशन रिसर्च ग्रूप, बडोदा १९८१ उद्धृत, कित्ता पान १४७.

५७. कित्ता पान १४७.

५८. तांबोळी (सं) पूर्वोक्त क्रांतिकारी..., पाने १२६-१३८.

५९. कित्ता पान १२९.

६०. कित्ता पान १३८.

६१. कित्ता पान १३८.

६२. पूर्वोक्त - भावे - प्रतिसाद उद्धृत, पान १०७.

६३. पूर्वोक्त मोरे डॉ. सदानंद - लोकमान्य ते... खंड २, पान ११२९.

६४. तांबोळी - पूर्वोक्त - क्रांतिकारक..., पान १३८.

६५. शास्त्री सोहनलाल - डॉ. बाबासाहेब अम्बेडकर के संपर्क में पच्चीस वर्ष, नई दिल्ली, सिद्धार्थ साहित्य सदन, पान ९२.

६६. कित्ता पान ९२.

६७. तांबोळी (सं) पूर्वोक्त क्रांतिकारक..., पान १०७.

६८. फरिदा खानम - मौलाना सैय्यद अबुल अला मौदुदी के सियासी खयालात का एक तफसिरी मुताअला - अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध - जामिया मीलिया इस्लामिया विद्यापीठ, नई दिल्ली - मार्च १३, १९९०, पान ९.

६९. मौदुदी - माहनामा जिंदगी - नोव्हेंबर १९७०, रामपूर, पाने १०-११ उद्धृत खानम् - प्रबंध, पान १८.

७०. कुरुंदकर - पूर्वोक्त जागर, पाने २४०-४१.

७१. कित्ता पान २४१.

७२. मौ. वहिदुद्दीनखान - पवित्र कुरआन - अनुवाद, नवी दिल्ली (दुसरी आवृत्ती) गुडवर्ड बुक्स २०११, पान ४७.

७३. मौदुदी - खुतबात - पुस्तिका १ दिल्ली मरकजी मक्तबाह इस्लामी, पान ३.

७४. कित्ता पान ४९.

७५. कित्ता पाने ४९-५०.

७६. मौदुदी - इस्लाम का निजामे हयात दिल्ली, मरकजी मक्तबाह इस्लामी.

७७. कित्ता पान १६.

७८. कित्ता पान २०.

७९. भावे श्री. मा. (सं.) - पूर्वोक्त, पान ८७.

८०. वकील डॉ. अलीम - एकाच पथावरील दोन पंथ - भक्ती आणि सूफी, पुणे, प्रतिमा प्रकाशन २०१२, उद्धृत, पान १२४.

८१. पूर्वोक्त - मौदुदी - इस्लाम का निजामे..., पाने २२-२३.

८२. मौदुदी - तफहिमात - हिस्सा अव्वल एडिशन जानेवारी १९७९, दिल्ली मरकजी मकतबाह इस्लामी, पान ८७, उद्धृत फरीदा खानम - प्रबंध पान ७६.

८३. तांबोळी पूर्वोक्त - पान २८.

डॉ. अलीम वकील
नाईकवाडपुरा, चांदवड,
जि. नाशिक ४२३ १०१
मोबाइल ९९६०६ ८८५४२.